म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
दा.क्र. : 3345

# कुसुमाग्रज गौरव

माधव गडकरी



REFBK-0025976

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 OCT 1989
23 OCT 1989
1 NOV 1989
1 NOV 1989
15 NOV 1989
17 DEC 1989
30 ... 1998

8 JUL 1992
18 JUL 1992
29 JUL 1992
5 AUG 1992
26 SEP 1992
18 FEB 1998

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन,
शनिवार पेठ,
पुणे : ४११ ०३०.

© कुंदा गडकरी
नवप्रभात हाऊसिंग सोसायटी,
हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ५७.

प्रकाशन काल : प्रथमावृत्ती
१२ ऑगस्ट १९८९
(जागतिक मराठी परिषद
अधिवेशन मुंबई येथे प्रसिद्ध झाले.)

मुखपृष्ठ : अपर्णा सोवनी व मोहन वाघ.

मूल्य : रुपये २५/- फक्त.

मुद्रक :
अजय ऑफसेट, पुणे : २.

टाईप सेटर : आलेख
'भारत भवन', १३६० शुक्रवार पेठ,
पुणे : २.

## लेखकाचे मनोगत

श्रेष्ठ नाटककार श्री. वि. वा. शिरवाडकर, 'बावनकशी प्रतिभेचे कवी', श्री. कुसुमाग्रज यांना दि. १७ सप्टेंबर १९८८ रोजी भारतीय ज्ञानपीठाचा पुरस्कार जाहीर झाला. तमाम महाराष्ट्राला या घटनेने आनंद झाला. मराठी साहित्यविश्व तर उपेक्षेच्या उन्हाळ्यात अधिक फुलणाऱ्या गुलमोहरासारखे डवरले. तेव्हापासून लिहिलेले हे लेख. कुसुमाग्रजांचा गौरव हा मराठी साहित्याचा गौरव होता. सर्वांवर प्रेम करणाऱ्या माणसाचा गौरव होता. हा गौरव सर्वांनी आपला मानला. कुसुमाग्रज गौरव म्हणजे मराठी साहित्याचा गौरव. तुमचा-आमचा गौरव. त्याचे हे शब्दांकन.

दि. १९ सप्टेंबर १९८८ च्या 'लोकसत्ता' अंकात या विषयावरील पहिला अग्रलेख मी लिहिला. त्यानंतर दि. ११ मार्च १९८९ रोजी हा ज्ञानपीठ पुरस्कार लोकसभेचे सभापती श्री. बलराम जाखर यांच्या हस्ते प्रत्यक्षात प्रदान करण्यात आला. दि. २४ एप्रिल १९८९ रोजी त्यांचा मुंबईतील अनेक संस्थांच्या वतीने विलेपार्ले येथे सत्कार करण्यात आला. तोपर्यंत या विषयावर जे लेख लिहिले आणि 'लोकसत्ते'त प्रसिद्ध झाले त्यांचा हा मुख्यत्वे संग्रह आहे. कोल्हापूरचे श्री. राम देशपांडे यांनी अशा तऱ्हेचा संग्रह काढण्याची सूचना केली. अनेकांनी ती उचलून धरली आणि प्रकाशक श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी ती प्रत्यक्षात आणली. कुसुमाग्रजांवर आधी आणि नंतर लिहिलेले लेखही समाविष्ट करण्यात आले आहेत.

कवी कुसुमाग्रजांवर यापूर्वीही मी अनेकदा लिहिले होते. हे दैवत तसे केवळ नाशिककरांचे राहिलेले नाही. ते सर्वांचेच झालेले आहे. सध्याच्या अस्थिर वैचारिक वातावरणात आणि मतामतांच्या गलबल्यात

मार्गदर्शनासाठी जावे अशी एकच व्यक्ती आज महाराष्ट्रात आहे, ती म्हणजे कुसुमाग्रज. राम गणेश गडकऱ्यांच्या 'भावबंधन' नाटकाचा खलनायक घन:शाम शेवटी धुंडीराजाकडे फक्त निरपेक्ष प्रेम असल्याची ग्वाही देतो. तसे निरपेक्ष प्रेम आणि निरपेक्ष सल्ला किंवा मार्गदर्शन हे आज दुर्मिळ झाले आहे. कोणत्याही वृत्तपत्राशी वाकडे नाही, सर्वांकडून गौरव होतो आहे, असे भाग्य लाभलेला हा मराठीतील नव्हे तर देशातील एकमेव साहित्यिक असावा. यातच त्यांच्या मोठेपणाचे सार साठविले आहे. या पुरस्कारानंतर श्री. तात्यासाहेब शिरवाडकर प्रथमच स्वत:बद्दल बोलू लागले. ते टिपलेले क्षणही 'तीन दिवसानंतर' या लेखात आहेत.

कवी कुसुमाग्रजांनी अजून परदेश प्रवास केलेला नाही. ताज्या भेटीत शिरवाडकर म्हणाले, 'तुमच्या बरोबर येण्यास मला आवडेल'. त्यांना दोन गोष्टी मुख्यत्वे पहावयाच्या आहेत. एक जुलियस् सीझरचे रोम आणि दुसरे शेक्सपियरचे स्ट्रॅटफोर्ड अपॉन ॲव्हन!

स्पेनचेही दर्शन घ्यावे असे मी त्यांना सुचविले. खरोखरच हा प्रवास त्यांनी केला तर त्यांच्या कविता जीवनाचा तिसरा खंड सुरु होऊ शकेल आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्याची वाटचाल 'नोवेल'च्या दिशेनेही होऊ शकेल. या वर्षभरात कवी कुसुमाग्रजांच्या साहित्याचे विवेचन करणारी अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली. मी माझ्या लेखात वाङमयीन समालोचन फारसे केलेले नाही. सामान्य वाचकाला जितके रसग्रहण अभिप्रेत असते, तितके घेतले आहे. त्यापेक्षा व्यक्ती आणि साहित्य यांचे नाते सांगण्याचा अधिक प्रयत्न केला आहे.

अनेक नामवंत लेखकांचा सहवास मला आयुष्यात लाभला. त्यात कै. वि. स. खांडेकर आणि कवी बा. भ. बोरकरांची नेहमी आठवण येते. कवी कुसुमाग्रजांचा लाभलेला सहवास म्हणजे पर्वणीच.

त्यांनी आमची जीवने फुलविली, समृद्ध केली. पहिल्या वहिल्या जागतिक मराठी परिषदेचे अध्यक्षपद ते भूषवित आहेत. त्यावेळी हे छोटेसे पुस्तक प्रसिद्ध करीत आहे. हा कुसुमाग्रज गौरव घरोघर गेला तर लिहिल्याचे सार्थक वाटेल.

दि. १४ जुलै, १९८९. — माधव गडकरी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3375
निबंध
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# १.
# शुचिर्भूत प्रतिभेचा गौरव

सर्व समाजाने एकमुखाने, आपसातील सर्व भेदाभेद आणि मतभेद विसरून आनंद व्यक्त करावा, अभिनंदन करावे अशा घटना हल्ली क्वचितच घडत असतात. कविवर्य कुसुमाग्रज यांना १९८७ चा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला, ही अशीच दुर्मिळ घटनांपैकी एक घटना म्हणावी लागेल. कुसुमाग्रजांना हा पुरस्कार मिळाल्याचे जाहीर झाले आणि महाराष्ट्रात जणु एक आनंदाची लहरच उसळून गेली. वि. स. खांडेकरांना १४ वर्षांपूर्वी हा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर मराठीतील साहित्यिकाला या पुरस्काराचा गौरव कुसुमाग्रजांच्या रूपाने प्राप्त झाला. कुसुमाग्रजांना हा पुरस्कार मिळावा ही खुद्द भाऊसाहेब खांडेकरांचीच इच्छा होती. खरे म्हणजे खांडेकरांनी मराठी साहित्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या तमाम मराठी साहित्यभक्तांची इच्छाच बोलून दाखविली होती. ज्ञानपीठ पुरस्काराला भारतीय साहित्याच्या संदर्भात जागतिक नोबेल पुरस्काराचे स्थान प्राप्त झाले आहे. गेल्या तेवीस वर्षांत भारतीय भाषांतील अनेक नामवंत साहित्यिकांना या पुरस्काराचा सन्मान मिळाला. या तेवीस मानकऱ्यांमध्ये केवळ खांडेकर हेच काय ते एकमेव

मराठी साहित्यिक होते; पण आता कुसुमाग्रजही त्या मालिकेत जाऊन बसले आहेत. केवळ पुरस्कार मिळाले की एखादा साहित्यिक थोर ठरतो असे नव्हे; आणि कुसुमाग्रजांसारख्यांना आपले थोरपण सांगण्यासाठी एखाद्या पुरस्काराची गरजही नसते. त्यांचे मोठेपण हे आधीच्या काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेले असते. आणि पुरस्कारच अशा साहित्यिकांच्या शोधात त्यांच्याकडे येतात.

**सार्वदेशिक मान्यता :**

अर्थात ज्ञानपीठ पुरस्कारासारख्या पुरस्कारांचा एक फायदा होतो व तो म्हणजे त्या साहित्यिकाला व त्याच्या साहित्याला सार्वदेशिक मान्यता प्राप्त होते. कुसुमाग्रजांना दिलेला हा पुरस्कार त्यांच्या एखाद्या विशिष्ट कलाकृतीसाठी दिलेला नाही, तर तो १९६७ ते ८२ या काळात त्यांनी निर्मिलेल्या सर्वच साहित्याचा साकल्याने विचार करून देण्यात आलेला आहे. ज्ञानपीठ परिक्षण मंडळाने हा पुरस्कार देताना म्हटले आहे : '१९६७ ते ८२ या काळात भारतीय साहित्यात कुसुमाग्रजांनी मोलाची व महत्त्वपूर्ण भर घातली. त्यांच्या लेखनाची व्याप्ती विशाल आहे. उसळणाऱ्या समुद्राप्रमाणे असणारी त्यांची कविता क्षितिजालाही गवसणी घालणारी आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून नेहमीच अन्याय व विषमता यांच्याविषयी आक्रोश व्यक्त केला आहे, आणि त्यांची नाटके म्हणजे शाश्वताचा शोध घेण्यासाठी सुरु असलेली एक महायात्राच म्हणावी लागेल.'

ज्ञानपीठ पुरस्कार मंडळाने कुसुमाग्रजांच्या १९६७ ते ८२ या पंधरा वर्षांतील साहित्याचाच केवळ वरीलप्रमाणे उल्लेख केलेला असला तरी त्यांचे सारे साहित्य हीच शाश्वताच्या दिशेने झेपावणारी यात्रा आहे. आणि म्हणूनच कुसुमाग्रज आणि त्यांचे साहित्य यांना मराठी माणसाच्या भावजीवनात एक निरपवाद आणि अढळ असे ध्रुवस्थान प्राप्त झाले आहे. कुसुमाग्रजांचा माणसाच्या चांगुलपणावर, त्याच्या अदम्य अशा इच्छाशक्तीवर, जीवनातील मांगल्यावर, शुचितेवर विश्वास आहे. हा विश्वास ही कुसुमाग्रजांच्या कथा-कादंबऱ्या, नाटके अशा सर्वच साहित्याची मूळ प्रेरणा आहे. ज्ञानपीठ मंडळाने कुसुमाग्रजांचा केलेला गौरव हा त्या सार्वकालिक, वैश्विक अशा मांगल्याचा आणि शुचितेचा

गौरव आहे. साहित्यिकाचे साहित्य आणि त्याचे व्यक्तिगत जीवन यांच्यात अनेकदा विसंगती अनुभवास येते. पु. ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे, कलानिर्मिती आणि निर्माता यांच्यातील अभेद पाहायला मिळणे हा योग तसा दुर्मिळच; पण कुसुमाग्रजांच्या बाबतीत मात्र हा अभेद प्रकर्षाने जाणवतो. म्हणून कुसुमाग्रजांना मराठी साहित्यरसिकांच्या मनामध्ये एखाद्या कुलदैवताचे स्थान प्राप्त झाले आहे, असे पु. ल. म्हणतात.

**साहित्याचे अंगभूत सामर्थ्य :**

पु. ल. देशपांड्यांनी कुसुमाग्रजांचे केलेले हे वर्णन केवळ भावनेच्या उत्कट भरात केलेले वर्णन नव्हे. कुसुमाग्रजांविषयीच्या याच भावनेचा अनेकांना अनेक प्रसंगी प्रत्ययही आलेला आहे. नाशकासारख्या तीर्थक्षेत्री गेलेला कोणताही साहित्यभक्त जितक्या भक्तिभावनेने पंचवटीतील रामाचे दर्शन घेतो, तितक्याच श्रद्धेने, आपल्या साहित्याचा गोदावरीइतकाच मंगल प्रवाह निर्माण करणाऱ्या कुसुमाग्रजांच्या दर्शनाने स्वत:ला धन्य समजतो. कै. जी. ए. कुलकर्णी यांनी कलावंताच्या सामर्थ्याविषयी लिहिताना एके ठिकाणी म्हटले आहे की, 'आता प्रकाश येऊ दे अशी इच्छा करावी आणि प्रकाश अवतीर्ण व्हावा, हे सामर्थ्य परमेश्वराचे. त्याखालोखाल हे सामर्थ्य कलावंताचे. त्याने लेखणी कागदावर ठेवताच वादळ घोंघावू लागते आणि व्याकूळ झालेला लियर माळरानावर भरकटू लागतो...... जीवनाच्या अश्वत्थाची सळसळ अखंड चालू असते आणि भिरभिरणाऱ्या पानांचे तरंगत खाली येणे कधी थांबतच नाही. प्रत्येक पान कदाचित खाली येताना उच्छ्वास सोडीत असेल.' कुसुमाग्रजांच्या साहित्यातील अग्निफुलांच्या आणि चांदण्याच्या हातांच्यां अंगी हे दाहक आणि शीतल असे सामर्थ्य आहे व म्हणून त्यांचे सर्वच साहित्य हे दिक्कालास भेदून जाणारे आणि एरवी दिवसेंदिवस अस्वस्थ, बकाल, दिशाहीन, वैफल्यग्रस्त होत जाणाऱ्या समाजास एक निश्चित दिशा, मांगल्याची प्रेरणा आणि अदम्य आकांक्षा देणारे साहित्य ठरले आहे. ज्ञानपीठ पुरस्कार कुसुमाग्रजांना देऊन साहित्यातील या सर्व शूचिर्भूत प्रेरणांचा गौरव करण्यात आला आहे. 'प्रदीर्घ काळानंतर मराठीला हा पुरस्कार मिळाल्याने झालेला आनंद अवर्णनीय आहे,' अशी

प्रतिक्रिया खुद्द तात्यासाहेबांनी व्यक्त केली आहे. जवळजवळ हीच भावना बहुतेकांनी आपापला आनंद प्रगट करताना व्यक्त केली आहे. मराठीला दुसऱ्यांदा हा गौरव प्राप्त झाला, याचा आनंद तर स्वाभाविकपणे आहेच; पण कुसुमाग्रजांनी आपल्या साहित्यातून ज्या प्रेरणा पुष्ट केल्या, त्यांचा गौरव झाल्याचा आनंद आणि अभिमान हा अधिक आहे. हा गौरव जेवढा 'कुसुमाग्रज' हे नाव धारण करणाऱ्या व्यक्तीचा आहे, तेवढाच किंवा त्याहूनही अधिक गौरव कुसुमाग्रजांनी गेली ५० वर्षे आचरलेल्या अव्यभिचारी अशा वाङ्मयीन तपाचरणाचाही आहे. म्हणूनच तमाम मराठी साहित्यिकांच्या वतीने कुसुमाग्रजांचे हरखून जाऊन अभिनंदन करीत असतानाच, सुवर्णाला सुगंधाची जोड देणारी ही निवड करणाऱ्या ज्ञानपीठ पुरस्कार मंडळाचेही मन:पूर्वक अभिनंदन!

## २.
## तीन दिवसांनंतर

*दि. १७ सप्टेंबर रोजी ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला आणि दि. २० सप्टेंबर रोजी नाशिकला गेलो. कविकुलगुरुंचे अभिनंदन करण्यासाठी श्री. हेमंत टकले यांच्या evergreen, Green View मध्ये ती रात्र कवी कुसुमाग्रजांच्या सहवासात गेली. श्री. वसंतराव कानेटकरही मैफलीत सामील झाले होते. त्या आनंदरात्रीचे हे वर्णन. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या मनाची कवडे आनंदाने खुली झाली होती, अशी ती रात्र, काव्यानंदात बुडालेली.*

**आनंदाचे डोही आनंद तरंग :**

ज्ञानपीठ पुरस्कारविजेते, सर्व रसिक वाचकांचे आवडते कवी कुसुमाग्रज यांचे अभिनंदन करण्यासाठी सर्व कामे बाजूला ठेऊन मंगळवारी नाशिकला गेलो. कविराजांना आनंदाचे डोही तरंगताना पाहून खूप समाधान वाटले. नेहमीप्रमाणे ते टेबलाजवळच्या खुर्चीवर बसले होते, परंतु जवळच पेढ्याचे ताट होते आणि त्यामधून स्वत: प्रत्येकाला ते पेढे देत होते. येणारेही पेढे घेऊन येत होते. आणि जाणारे घेऊन जात होते. दि. १७ सप्टेंबर रोजी कवी कुसुमाग्रजांना हा ज्ञानपीठ

पुरस्कार जाहीर झाला त्या रात्रीपासून हा आनंदोत्सव सुरू झाला तो अजून थांबलेला नाही. शिरवाडकर म्हणजे नाशिककरांचे दैवत; परंतु कविता न वाचणाऱ्या अशिक्षितांनीही हारतुरे घेऊन, दोन दिवस तीर्थक्षेत्री रांगा लावाव्यात, तशा कवीच्या घराशी लावल्या याचे आश्चर्य वाटले. कवी कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्याचे फलक नाशिकच्या झोपडपट्ट्यांतही लागले होते. हे लावले की लागले असा वृत्तपत्रीय प्रश्न माझ्या मनात उभा राहिला. त्याचे फार चांगले उत्तर एकाने दिले. नभोवाणी आणि दूरदर्शनची ही किमया. ज्ञानपीठ पुरस्कार शिरवाडकरांना मिळाल्याची बातमी दूरदर्शनने आणि नभोवाणीने मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा तिन्ही भाषांत दिली. ती लोकांनी ऐकली. ज्या अर्थी तिन्ही भाषांत ही बातमी दिली, त्या अर्थी हे पारितोषिक खूप मोठे असले पाहिजे हे सामान्यांनी जाणले आणि आपल्या नाशिककराचा असा गौरव झाला, यात तेच इतके आनंदित झाले की, तरुण-तरुणी, आबाल-वृद्ध सारे घराकडे निघाले. श्री. वसंतराव कानेटकरही पोहोचले होते. ती गर्दी पाहून ते शिरवाडकरांना म्हणाले, 'हत्तीवरून साखर वाटावी असा हा आनंदाचा क्षण आहे.' लोकहितवादी मंडळ यासारख्या अनेक संस्थांच्या कार्यात शिरवाडकरांचा अनेक वर्षांचा सहभाग असल्यामुळे केवळ कवी अगर नाटककार म्हणून नाशिककर त्यांना ओळखत नाहीत; तर कौटुंबिक आणि सामाजिक मार्गदर्शन करणारे म्हणून शिरवाडकर नाशिककरांना प्रिय आहेत. त्यांचे अपूर्व प्रेम व्यक्त करण्याची सोनेरी संधी या पुरस्काराने मिळाली. पाऊस सर्वत्रच आहे. नाशिक त्याला अपवाद नव्हते. बाहेर आकाशीचा पाऊस आणि आत लोकांचा पाऊस यामध्ये कविराज बुडाले. मंगळवारी भेटले तेव्हा पूर ओसरू लागला असल्याचे वृत्त बातम्यांत यावे तसे शिरवाडकर म्हणाले, 'सोमवारपासून गर्दी कमी झाली आहे.' एकूण २५० तारा आणि साधारण ८०० पत्रे आल्याचे वृत्त सन्मित्रानी दिले आहे. सर्व भारतीय भाषांतील लेखकांतून एकाची निवड या पुरस्कारासाठी केली जाते. मराठीतील चार लेखकांची नावे प्रादेशिक यादीत होती. श्री. वि. वा. शिरवाडकर, श्री. विंदा करंदीकर, श्री. पु. ल. देशपांडे आणि प्रा. गंगाधर गाडगीळ अशा चौघांच्या नावांचा विचार प्रादेशिक समितीत

झाला. महाराष्ट्र समितीत श्रीमती सरोजिनी वैद्य होत्या. अखिल भारतीय समितीत श्रीमती विजया राजाध्यक्ष होत्या. त्यांच्या चर्चेत काही कमीजास्त झाले, परंतु अखेर शिरवाडकरांचे नाव एकमताने पुढे गेले. कवी आणि नाटककार या दोन साहित्यशाखांत विक्रम प्रस्थापित करणारे, साहित्यजगात मार्गदर्शक म्हणून वावरणारे आणि जीवनमूल्ये जपणारे म्हणून शिरवाडकरांना महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील लेखकांत अग्रक्रम मिळाला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आणि 'सुंदर मी होणार' असे गीत लिहिणाऱ्या कवी गोविंदांच्या नाशकात कवी कुसुमाग्रजांना साहित्यसौंदर्याने आणि प्रेमाने घेरलेले पाहिले. आम्ही सारे कृतकृत्य झालो.

**'गर्जा जयजयकार' :**

मंगळवारी रात्री जी गप्पांची आणि कवितांची मैफल झाली, त्यात असे स्पष्ट झाले की, या गृहस्थाला स्वत:ला कवी व्हायचे नव्हते. श्री. वसंतराव कानेटकर बैठकीत म्हणाले की, त्यांना नट व्हायचे होते. श्री. शिरवाडकरांनी त्यासाठी भरपूर धडपड केली. मुंबईत ते त्यासाठी १०-१० मैल पायी चालले आहेत. व्ही. शांताराम यांच्याकडेही ते गेले होते. त्यांना शिरवाडकरांनी गाऊन दाखविले होते. नंतर त्यांनी पत्रकार व्हायचे ठरविले. श्री. शिरवाडकर त्या दिवशी म्हणाले, 'पत्रकारितेला योग्य असा तो काळ होता.' त्यांनी "Vibrant" असा शब्द वापरला. ते म्हणाले, 'एकीकडे महायुद्ध सुरू झाले होते व दुसरीकडे स्वातंत्रलढ्याची तीव्रता वाढत होती.' परंतु तोही रस्ता त्यांना एक दिवस सोडून द्यावा लागला. 'प्रभात' दैनिकातून रात्रपाळी संपवून परत जाताना त्यांनी डमडम तुरुंगातील राजबंद्यांनी अन्नत्याग करून प्राण अर्पण केले, ही बातमी वाचली. त्यामधून 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' ही कविता कशी जन्माला आली याचा उल्लेख लेखात केला होता.

त्यात 'प्रभात' मुंबईचे म्हटले होते. ते कै. वालचंद कोठारींचे पुण्याचे 'प्रभात' हवे. पत्रकार होण्यासाठी शिरवाडकरांनी जंगजंग पछाडले. ते नट झाले नाहीत, पत्रकार झाले नाहीत, परंतु वृत्तपत्राच्या रात्रपाळीतच त्यांच्यातील खरा कवी जन्माला आला. श्री. कुसुमाग्रज त्या रात्री एक सुंदर वाक्य बोलले. ते म्हणाले, 'माणसाला आयुष्यात काही व्हायचं

असतं, परंतु जसे दिवस जातात, तसे प्रकृतीत जे वसणारं नसतं, ते हळूहळू गळत जातं. तसं माझं झालं असावं.'

या कवितेवर बंदी आली असे मला सांगण्यात आले. त्याबद्दल श्री. शिरवाडकरांना विचारले. ते म्हणाले, 'बंदी अशी आली नाही. पु. मं. लाड यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात साहित्य संमेलन भरले, तेव्हा अमरशेख ही कविता म्हणणार होते. परंतु पु. मं. लाड हे आय. सी. एस. अधिकारी. त्यामुळे त्यांच्या उपस्थितीत हे गीत म्हटले गेले तर ते अडचणीत येतील असे काही अधिकाऱ्यांनी सुचविले. त्यामुळे ते म्हणण्यात आले नाही. नंतर अमरशेखनीच ते म्हटले व लोकप्रिय केले. 'त्यांनी लावलेली चाल ही खरी', तात्यासाहेब म्हणाले. दूरदर्शनवरील चाल अजिबात पसंत नसल्याची पुस्तीही त्यांनी जोडली.

त्यांच्या आवडत्या कवितांचे दर्शन हा अशा मैफलीतील कार्यक्रम असतोच. 'प्रेम कुणावरही करावे', ही त्यांची आज सर्वांत प्रिय असलेली कविता आहे. शिरवाडकर आज खरोखरच त्या मन:स्थितीत आहेत. ते एक वाक्य सहज बोलून गेले. 'ज्ञानयोग किंवा कर्मयोग खरा नसून प्रेमयोग हाच खरा आहे. 'प्रेमयोग' या कवितेमागील त्यांची जीवनधारा या विधानात प्रकट झालेली दिसली. त्यांच्या आणखी दोन कविता त्या रात्री पावसाच्या सरीबरोबर आल्या. त्यामधील एका कवितेचाच उल्लेख करतो. 'कणा' ही त्यांची कविता त्यांना फार प्रिय दिसली. स्वत:च्याच आयुष्याचा अर्थ ते त्या कवितेत शोधीत आहेत, असे त्यांच्या उपस्थितीत कविता ऐकताना वाटले. प्रचंड पूर आल्याने झोपडपट्टीतील ज्यांचे घर वाहून गेले आहे, तो कवीच्या दारात येऊन उभा राहून हे म्हणतो आहे:

**'कणा'**

**ओळखलत का सर मला,**
**पावसात आला कोणी**
**कपडे होते करदमलेले**
**केसावरती पाणी**
**क्षणभर बसला, नंतर हसला,**

बोलला वरती पाहून,
गंगामाई पाहुणी आली,
गेली घरट्यात राहून
माहेरवासी पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी
बायको मात्र वाचली
भिंत खचली, चूल विझली,
होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापणीमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे सर आता
लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे
चिखलगाळ काढतो आहे
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
'पैसे नको सर' जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार, तरी मोडला
नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा.

**खांडेकरांचे ऋणानुबंध**

वि. स. खांडेकरांच्या ऋणानुबंधाचा विषय निघाला. खांडेकरांनी आपणहून कुसुमाग्रजांच्या कवितांचे संपादन केले आणि स्वखर्चाने तो प्रसिद्ध केला. ही हकीगत खरी असल्याचे ते म्हणाले. त्या काळात जवळजवळ ७०० रु. खांडेकरांनी स्वत: या पहिल्या संग्रहाच्या छपाईसाठी खर्च केले, अशी माहिती श्री. शिरवाडकरांनी या भेटीत दिली.

'तुम्ही शिरोड्याला त्यांच्याकडे गेला होतात काय?' मी विचारले.

'नाही. मुंबईला डॉ. भडकमकरांकडे, नीलम मॅन्शनमध्ये मी प्रथम त्यांना भेटलो. नंतर कोल्हापूरला भेट झाली. परंतु शिरोड्याला जाण्याचा योग कधी आला नाही.'

खांडेकरांनी ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा त्यांना पूर्ण अंधत्व आले

होते, हे शिरवाडकरांना माहीत नव्हते. त्यावद्दल ते फार हळवेपणाने विचारत होते. या दोघांवर महात्मा गांधींच्या विचारांचा त्या काळात अतिशय प्रभाव पडला. मंगळवारच्या रात्रीही शिरवाडकर महात्माजींच्या नोआखालीतील 'एकला चलो रे' चे गुणगान अभिमानाने करीत होते. परंतु चर्चेत त्यांनी हे मान्य केले की, मार्क्सवादाचा प्रभावही तितकाच पडला. श्री. वसंतराव कानेटकर तर म्हणालेच, 'तात्यासाहेब, तुम्ही खरे कम्युनिस्ट आहात!'

कविराज हसले आणि म्हणाले, 'तुम्ही सर्वजण म्हणता ते खरे आहे, परंतु मी मला अजून शोधतो आहे. तो शोध पुरा झाला की मला काय वाटते ते सांगेन!'

# ३
# खांडेकर ते शिरवाडकर

*भारतीय ज्ञानपीठाचा पुरस्कार मिळविणारे हे पहिले मराठी लेखक कै. वि. स. खांडेकर होते. तुमच्यानंतर हा पुरस्कार कोणाला मिळावा असा प्रश्न त्याना विचारण्यात आला तेव्हा त्यांनी कुसुमाग्रजांचे नाव घेतले होते. खांडेकरांना १९७२ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यानंतर १६ वर्षांनी कवी कुसुमाग्रजांना हा सन्मान प्राप्त झाला. कुसुमाग्रजांचा पहिला कवितासंग्रह वि. स. खांडेकरांनी स्वतः संपादित करून प्रकाशित केला होता. या दोघांच्यात एक दुवा होता. त्याचे हे विवेचन. 'रविवारचा दृष्टिक्षेप' या स्तंभात केलेले.*

कवी कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला, आणि अंगावर श्रावणसरी सहजपणे पडाव्यात असा आनंद मराठी साहित्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाला झाला. खरं सांगायचं म्हणजे आपल्यालाच ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला असं प्रत्येकाला वाटलं. कविराजांनी प्रतिक्रिया देताना पहिलं विधान सहजपणे केलं. दुसरं विधान जरा विचार करून केलं असावं. 'मला आनंद झाला', हे पहिलं विधान. 'मराठी साहित्याचा गौरव झाला', हे दुसरं विधान. आणि खांडेकरांनंतर मला मिळालं याचा

विशेष आनंद', हे आणखी एक विधान. या तिन्हींत कुसुमाग्रज दिसतात, कारण या तिन्ही गोष्टींत त्यांचे व्यक्तिमत्त्व साठवलेले आहे. खांडेकरांचा दिव्यत्वाच्या उपासनेचा वारसा मराठी साहित्यात चालविला तो शिरवाडकरांनीच. शिरोड्याला भिके डोंगरीवर जाऊन समुद्राकडे पाहात बसणारे खांडेकर हे अनामिक अगस्ती होते, तर भरसमुद्रात जहाज उतरविणारे आणि 'किनारा तुला पामराला' असे गाणारे कुसुमाग्रज हे कोलंबस आहेत. साहित्य आणि व्यक्तिमत्त्व एकसंध असलेली ही दोन्ही माणसे - खांडेकर-शिरवाडकर! प्रकाश पूजेचे वेड घेऊन वावरली, त्यामुळे दोघेही साहित्याचे केंद्रबिंदू झाले. 'जनात धूळ घेऊन फिरणारा शब्द जेव्हा साहित्यात येतो तेव्हा त्यास सुगंध व व्यक्तिमत्त्व प्राप्त होते!' असे शिरवाडकर म्हणतात. प्रत्यक्षात उभयतांच्या व्यक्तिमत्त्वाने आमच्या पिढीला सुगंध दिला तर त्यांच्या शब्दांनी पुरुषार्थ आणि आशावाद यांच्या मशाली पेटविल्या. खांडेकरांच्या नंतर १४ वर्षांनी शिरवाडकरांचीच निवड या पुरस्कारासाठी व्हावी हा योगायोग नाही. जीवन आणि साहित्य यांच्या सहप्रवासाचा हा फेरविजय आहे. खांडेकर हे कुसुमाग्रजांचे श्रद्धास्थान होते. कारण कुसुमाग्रजांचा पहिला कविता-संग्रह खांडेकरांनीच तयार करून प्रसिद्धीच्या प्रकाशात आणला होता. 'कोल्हापूर आता रिकाम्या देवळाप्रमाणे झाले. त्यात मूर्तीच उरलेली नाही', ही शिरवाडकरांची खांडेकरांच्या निधनावरील प्रतिक्रिया होती. कलेसाठी कला हा वाद फडकेयुग संपले आणि साफ मागे पडला. जीवनासाठी कला या विचाराचा विजय झाला. याचे कारणच असे की, तेव्हा खांडेकर आणि आता शिरवाडकर असे दोन जीवनवादी साहित्यिक आपल्याला लाभले. त्यांनी जीवनाला आवश्यक असलेल्या माणूसकीची आपल्या साहित्यातून पूजा मांडली. विशाल मानवतेच्या भवितव्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. वाचणाऱ्यांना कलात्मक आनंद देऊनच ते थांबले नाहीत तर संकटे सामोरी असलेल्यास जगण्याची जिद्द आणि आवाज लागत नाही म्हणून चिंताग्रस्त झालेल्यास गाण्याची उर्मी दिली. आज हे लिहिताना खांडेकरांची अतिशय उत्कटतेने आठवण येते. कुसुमाग्रजांच्या या किताबतीने सन्मान झाला याचा अपरिमित आनंद त्यांना झाला असता. खांडेकरांना त्या वेळी असलेला एक लाखाचा

पुरस्कार मिळाला तेव्हा ते पूर्ण अंध झाले होते. दिल्लीहून पुरस्कार घेऊन ते परतले आणि पुण्यास राहिले, पुण्यात त्यांचा मुक्काम प्रकाशक रा. ज. देशमुख यांच्या निवासस्थानी होता.

**अंत:चक्षूंचे खरे दर्शन :**

लोडाला टेकून भाऊ बसले होते. डोळ्यांची दुसऱ्यांदा केलेली शस्त्रक्रिया पूर्णपणे अयशस्वी झाली होती. ही शस्त्रक्रिया नीटपणे व्हावी आणि ती भाऊंनी करून घ्यावी म्हणून त्यांच्या चाहत्यांनी त्यांना मुंबईस आणले. लता मंगेशकरांकडे त्यांचा मुक्काम होता. परंतु मनासारखे काही घडले नाही. 'अंत:चक्षूंचे खरे दर्शन मला आता झाले. दोन्ही डोळे गेले तेव्हा! अंत:चक्षूंनीच मी सारे पाहतो आहे', असे ते सर्वांना सांगत. मलाही सांगितले. त्यांच्या साहित्यात सतत प्रकटणारे अंत:चक्षू पूर्ण उघडण्याची वेळ लेखकावरच यावी याचे वाईट वाटले. परंतु नंतर लक्षात आले की, आमच्या समाधानासाठी व स्वत:चेही क्षणभर समाधान करून घेण्यासाठी ते बोलत होते. लक्ष्मीने सरस्वती-पुत्राला वरले होते, परंतु तिचा झगमगाट काही पाहू शकत नव्हते. त्या वेळी खांडेकरांचे वय ७८ होते. कुसुमाग्रज आता ७६ वर्षांचे आहेत. हे असे लाड दीड-लाखाचे पुरस्कार आयुष्यात इतके उशिरा येतात की त्यांचा मिळणाऱ्याला फारसा उपयोग होऊच नये. एक लाख रुपये मिळाले तर मी काय करीन, असा निबंध शिरोडा मुक्कामी लिहिणारे खांडेकर खरोखरच एक लाख रुपये घेऊन दिल्लीहून आले तेव्हा ते एक लाख ते काही पाहू शकले नाहीत. श्री. शिरवाडकर त्या दृष्टीने भाग्यवान की त्यांना दीड लाख दिसतील, परंतु त्यांना जे ओळखतात ते जाणतील की कविराज त्या पैशाकडे फारसे पाहणारही नाहीत.

**दोन्ही दत्तक :**

खांडेकर आणि शिरवाडकर हे दोघेही दुसऱ्या घरात दत्तक गेलेले लेखक. दोघांच्याही घरात वकिली. गणेश आत्माराम खांडेकर हे भाऊंचे खरे नाव. ते इंटरच्या वर्गात पुण्याला शिकत असताना नानेलीच्या चुलत चुलत्यांना दत्तक गेले आणि विष्णू सखाराम झाले. कवी कुसुमाग्रजांचे वडीलही वकील. त्यांना सात मुले झाली. शिरवाडकरांचे पहिले नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर. हे भाऊबंद एकदा रंगनाथांना म्हणाले,

'तुमचा गजानन आम्हाला दत्तक द्या.' आणि वडिलांनीही दिला. गजानन रंगनाथ विष्णू वामन झाला. २०-२१ सालची म्हणजे कविराज ८-९ वर्षांचे असतानाची ही गोष्ट. खांडेकरांचे व शिरवाडकरांचे दोघांचेही दत्तक नाव विष्णू असावे आणि दोघांचीही चरणसेवा करण्यासाठी लक्ष्मी नसावी हेही कमी महत्त्वाचे नाही. मॅट्रिकच्या परीक्षेत १९२० मध्ये आठवे आलेले खांडेकर शिरोड्याला शिक्षक होण्यासाठी चालत गेले आणि सरकारी नोकरी कोणत्याही परिस्थितीत करावयाची नाही म्हणून नशीव काढण्यासाठी मुंबईस आलेले शिरवाडकर हे दोघेही सारखे. कारण दोघांच्यातही ध्येयवादाची ज्योत तेवत होती, आणि त्या ज्योतीने जे चेतविले त्यांचे साहित्य झाले. शिरोड्याला मिठाचा सत्याग्रह झाला, तेव्हा खांडेकर त्या गावात आहेत. त्यामधून 'उल्का' सारखी कादंबरी जन्म घेते. या 'उल्का'त पुन्हा गोविंदाग्रज आहेत. गडकऱ्यांच्या साहित्याने, विशेषतः काव्याने भारलेले खांडेकर गोविंदग्रजांच्या कविता कादंबरीतील पात्रांच्या तोंडी घालीत आहेत. आणि इकडे शिरवाडकर गडकऱ्यांची नाटके तोंडपाठ म्हणत होते. मोठ्या माणसांशी जवळीक सांगण्यासाठी नव्हे, परंतु मला खांडेकर आणि शिरवाडकर या दोघांचाही जो सहवास लाभला, तो माझ्या आयुष्यातील मोठा ठेवा आहे. 'पूर्वायुष्यात एक गडकरी भेटले, उत्तरार्धात पुन्हा गडकरी भेटले,' असे भाऊंनी पत्र पाठवून माझे कौतुक केले होते. कुसुमाग्रजांचे पुन्हा तेच नाते. आम्हा गडकऱ्यांचे गाव निफाड. त्या निफाड तालुक्यातील शिरवाडे हे कविराजांचे गाव. पिंपळगाव वसवंत येथे त्यांच्या वडिलांनी वकिली केली. या गावात पाराशरी नदीच्या काठावर एक मोठा वड होता, त्याला लोक ईश्वरी वड म्हणत. कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'त 'विराट वड' ही कविता आली, ती या वटवृक्षावरील. साधूच्या जटांप्रमाणे पारंब्या असलेला हा वड पुढे रस्तारुंदीसाठी पाडला गेला, परंतु कुसुमाग्रजांच्या कवितेत कायम राहिला. वडील साहित्यप्रेमी, मामा कादंबरीकार-कवी, त्यात वणीला दिवाळीत शिरवाडकरांचा मुक्काम असे. तेथे राम गणेशांची सारी नाटके त्यांनी तोंडपाठ केली. खांडेकरांनी 'गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय' हा ग्रंथ त्या वेळी लिहून गडकरी साहित्याचे मूल्यमापन कोल्हटकरी चष्म्यातून केले, आणि शिरवाडकरांना मराठी

नाट्य परिषदेचा पहिला राम गणेश गडकरी पुरस्कार मिळाला, तेव्हा 'नटसम्राट'चे कर्ते काय म्हणाले? 'मी लिहायला सुरुवात केली तेव्हा ५० वर्षांपूर्वी वाङ्मयाच्या रूपाने गडकऱ्यांची भेट झाली नसती तर मी लेखनाकडे वळलो असतो की नाही हे सांगता येत नाही. राम गणेश गडकऱ्यांच्या लखलखणाऱ्या दीपमालेत मी माझी छोटीशी पणती पेटविलेली आहे. ६० वर्षे झाली तरीपण गडकऱ्यांच्या नावाची नशा अद्याप उतरली नाही.'

खांडेकर आणि शिरवाडकर ह्या दोघांनीही राम गणेशांचा वारसा उचलला, शिरवाडकरांनी नाटकात आणि काव्यात गडकऱ्यांवर मात केली. अंत:करणात अंगार असलेले हे तिघेही शब्दप्रभू. पुण्याच्या दैनिक 'प्रभात' मध्ये उपसंपादक म्हणून काम करीत असलेले श्री. शिरवाडकर रात्रपाळी संपवून घरी निघाले असताना बातमी पाहतात! डमडमच्या तुरुंगात चार देशभक्तांनी अन्नत्याग करून आत्मसमर्पण केलेले असते! ४२च्या आंदोलनाचा तो काळ. कवीच्या मनात त्या रात्री उफाळलेला प्रक्षोभ म्हणजे 'गर्जा जयजयकार' ही कविता!' ती म्हणत असंख्य स्वातंत्र्यसैनिक नंतर तुरुंगात गेले. 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल', हे स्वप्न कवितेत पाहणारे कुसुमाग्रज आणि 'उल्का'त, 'दोन ध्रुव' अंणि 'दोन मने' यात पूर्ण रुतलेले खांडेकर 'क्रौंचवधा'कडून 'ययाती'कडे येतात, तेव्हा ते पूर्णत्वाकडे पोहोचल्यासारखे वाटतात. शिरवाडकरांचा 'दूरचे दिवे' पासून 'नटसम्राट' पर्यंतचा प्रवास मला असाच स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या ध्येयपथावरील प्रवासासारखा वाटतो. या दोघांनाही केवळ ध्येयपथावर वाटचाल करताना पाहिले नाही, तर त्या पथावर येणाऱ्यांना मार्गदर्शन करताना, प्रेमाचा हात पाठीवरून फिरवताना मी पाहिले आहे, अनेकांनी पाहिले आहे. दोघांचेही वैयक्तिक जीवन फारसे सुखी नव्हते. दोघांच्याही सहचारिणी फार लौकर त्यांना सोडून गेल्या. खांडेकरांचे घर कन्येने मंदाताईने हसरे ठेवले. कुसुमाग्रज आजही घरात एकटे. पुरस्कार मिळाल्याचे वृत्त घेऊन पत्रकार दारी आले तरी स्वारी एकटीच स्वस्थ वाचत पडलेली. परंतु त्याचा अर्थ या उभयतांच्या मनात द्वंद्व नव्हते, आणि कुसुमाग्रजही अस्वस्थ नाहीत असा नाही. 'चंद्र आपल्या जखमा स्वत:जवळ ठेवून जगाला शांत चांदणे देत

दारी आले तरी स्वारी एकटीच स्वस्थ वाचत पडलेली. परंतु त्याचा अर्थ या उभयतांच्या मनात द्वंद्व नव्हते, आणि कुसुमाग्रजही अस्वस्थ नाहीत असा नाही. 'चंद्र आपल्या जखमा स्वतःजवळ ठेवून जगाला शांत चांदणे देत राहतो', हे त्यांचे वाक्य ते दुसऱ्यांसाठी वापरतात. परंतु ते खरे त्यांच्या बद्दलचेच आहे. 'सोन्याचे दुःख त्याला तापवले याचे नसते. कसाला लावण्याचेंही दुःख त्याला नाही. पण गुंजेबरोबर आपण तोलले जातो याचे दुःख त्याला फार होते.' लेखकांची लोकाभिमुखता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. खांडेकर आणि शिरवाडकर यांच्या प्रेरणा समाजाचे, लोकांचे दुःख हेच होते. माणसाचा अंतरिक संघर्ष हा पर्यायाने समाजातील विविध शक्तींचा संघर्ष असतो. कर्णाच्या रूपाने शिरवाडकरांना मानवी जीवनाचे महायुद्ध दिसले. समाजातील उपेक्षितांचा तो प्रतिनिधी आहे. त्याला प्रेम देणारा कुणीतरी हवा असतो. आणि त्याला भेटतो तो दुर्योधन. त्याला तो निष्ठा देतो आणि त्याच्या बाजूने उभा राहतो आणि दोन आव्हानांनी तो दुभंगतो. कुंती आपली आई असल्याचे कळते आणि पांडव भाऊ असल्याचे समजते आणि कवचकुंडले असून नसल्यासारखी होतात आणि अस्त्राचा मंत्रच त्याला आठवत नाही. तो मरण पत्करतो. प्रेम, निष्ठा या मूलभूत मानवी भावनांचा संघर्ष अतिशय भेदक भाषेत शिरवाडकर 'कौंतेय' मध्ये मांडतात. 'नटसम्राट' मध्ये कावेरीची व्यक्तिरेखा त्या सम्राटालाही माणसात आणावयास उपयोगी पडते.

कै. खांडेकरांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला, तेव्हा 'ययाती' मुळे तो मिळाला अशी एक चर्चा झाली. हे पुरस्कार एकूण साहित्यसेवेबद्दल असतात, साहित्य अकादमीचा पुरस्कार कुसुमाग्रजांना कवितेबद्दल मिळावयास हवा होता, तो नाटकाला मिळाला. खांडेकरांच्या 'ययाती' ला साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभला. शिरवाडकरांना पुणे विद्यापीठाने डी. लिट. पदवी दिली त्या वेळी शिरवाडकर म्हणाले, 'मला डॉ. शिरवाडकर असे म्हणटले की अंगावर काटा उभा राहतो!'

श्री. वि. स. खांडेकरांची 'अश्रू' ही कादंबरी १९५४ साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर सहा वर्षांनी १९६० मध्ये 'ययाति' ही कादंबरी मोठ्या धडपडीनंतर प्रकाशित झाली. त्यानंतर १६ वर्षांनी वि. स. खांडेकरांना

ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. १९५४ ते १९६० या कालावधीत खांडेकरांना आजाराने वेढले होते. 'आपण सारे नियतीच्या जात्यात भरडले जाणारे दाणे आहोत', असे एक वाक्य ते 'मनोगता'त लिहून गेले आहेत. परंतु दि. २६ फेब्रुवारी १९७६ रोजी 'ज्ञानपीठ पुरस्कारा'चा स्वीकार करताना त्यांनी जे भाषण केले त्यामध्ये खांडेकरांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे की ज्याचा धागा शिरवाडकरांशी जुळतो.

श्री. खांडेकर आपल्या भाषणात म्हणाले, 'मानव हा एक अंध क्रूर शक्तीच्या हातातले बाहुले आहे असे मानणे म्हणजे त्याच्या ठिकाणी जी दिव्य ठिणगी असते, तिचे अस्तित्व नाकारणे होय. आजकालच्या सर्जनशील वाङ्मयात विफलतेची जी नानाविध प्रतिबिंबे दिसतात त्यांचा उगम मानवाने मोठ्या आशेने पूजिलेल्या व त्याला न पावलेल्या अनेक देवांच्या पराभवात आहे. यातला शेवटचा देव मनुष्य हा स्वत:च आहे.'

'सरस्वती ही साहित्य आणि कला यांची अधिष्ठात्री देवता, मानवाची बुद्धी आणि हृदय यांची जडता दूर करणारी सात्त्विक शक्ती. तिने आजच्या मानवातल्या ह्या प्रॉमिथिअसला आपले शुभाशीर्वाद द्यावेत अशी माझी तिच्या चरणी नम्र प्रार्थना!'

श्री. शिरवाडकरांना मिळालेला पुरस्कार हा त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा त्याचप्रमाणे या शुभाशीर्वादाचाच भाग. खांडेकरांना हा पुरस्कार मिळाला तेव्हा श्री. उमाशंकर जोशी हे त्या समितीचे अध्यक्ष होते. 'कथा आणि काव्य, मनोविज्ञान आणि त्याचे चित्रण हातात हात घालून आले आहे', असे 'ययाति' कादंबरीचे वर्णन श्री. उमाशंकर जोशी यांनी केले आहे. 'ययाति' स्वत:च आपली कथा या कादंबरीत सांगतो आहे.

श्री. शिरवाडकरांचे 'ययाति आणि देवयानी' हे नाटक संगीताने अधिक गाजले. या पुराणकथेने विशेषत: कामातुर ययातीच्या शर्मिष्ठा-देवयानी संबंधाच्या संघर्षाने दोघांनाही व्यापले होते आणि मानवी जीवनाच्या एका मूलभूत भावनेचा खेळ कसा चालतो याच्या संशोधनात दोघेही गुंतलेले होते. देवयानीचे खरे प्रेम कचावर असताना ती शर्मिष्ठेला सूडभावनेने दासी करते, परंतु दासी ययातीला वासनेत अडकवून राणीवर ताण करते. खांडेकरांचा ययाती शेवटी म्हणतो, 'सुखात, दुखा:त, सदैव एक गोष्ट लक्षात ठेव. काम आणि धर्म हे महान पुरुषार्थ

आहेत. हे पुरुषार्थ केव्हा अंध होतील याचा नेम नसतो!.... त्यांचे लगाम अष्टौप्रहर धर्माच्या हाती ठेव!'

**खांडेकर-शिरवाडकर हे तसे खऱ्या अर्थाने प्रवासी आहेत.**

**'मी जातो आहे पुढे, सारखा पुढे**
**या प्रवासांतच आहे**
**प्रवासाची अंतिम सांगता....**
**रस्ता शिरे पावलांत**
**तोच धनी चालविता**
**झाला आता......**

कुसुमाग्रज हे आज एका परीने तृप्त आहेत परंतु अंतर्मनात एकाकी आहेत. मित्रांच्या सहवासात हा एकाकीपणा ते विसरतात. नाशिककरांनी त्यांना सांभाळले आहे. आतमध्ये सतत कालवाकालव चालू असलेला हा कवी हसतो मात्र मुक्तपणे. ते माणसांवर बोलतात, व्यक्तीवर कधीच नव्हे. खांडेकरांना शिरोडेच शेवटपर्यंत प्रिय होते. त्या शिरोड्याला त्यांना घेऊन गेलो ते दिवस आज आठवतात. दि.१५ ऑगस्ट रोजी आम्ही शिरोड्यात होतो. तेव्हा माऊलीच्या मंदिरातही जाऊन आलो. कल्पना नव्हती की खांडेकर-शिरवाडकर यांच्या एकत्रित वाङ्मयीन प्रवासाचा असा आलेख महिन्याभरात लिहावा लागेल. आता कुसुमाग्रजांकडे जायचे आहे. त्र्यंबकेश्वरचे उलटे धबधबे पाहण्यासाठी. 'शत्रूवरही प्रेम करावे, प्रेम कुणावरही करावे.' अशा मन:स्थितीत सध्या ते आहेत. खांडेकरांनाही न लाभलेली एक वैचारिक पूर्णावस्था त्यांना प्राप्त झाली आहे. मराठी साहित्यातील मानव्याची चढती कमान कुसुमाग्रजांत दिसते, म्हणून आज त्यांचे चहाते नतमस्तक होतात, आनंदाने फुलून येतात. इतके प्रेम कोणत्याही कवीवर वाचकांनी केले नाही. 'देवळाच्या दारामध्ये भक्ती तोलणार नाही', असे कविराज म्हणतात, परंतु त्यांच्या दारात सध्या जी रीघ लागली आहे ती त्यांच्याप्रमाणे त्यांच्यावरील भक्ती न तोलणाऱ्यांचीच आहे. खांडेकर आणि शिरवाडकर हे दोघेही मानवतेचे पुजारी म्हणूनच लोकांपुढे वावरले आणि लोकांनी त्यांच्यावर सदैव भक्तिभावच प्रकट केला. सध्या सतत पाऊस पडतो आहे, गोदावरीचे पाणीही चढले आहे. त्याचे कारण तेच असावे.

३३७५
२५७७६
निबंध १४५८८

४.

## मराठी भाषा आणि साहित्याचा गौरव

*कवी कुसुमाग्रजांना भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार प्रत्यक्षात प्रदान करण्याचा कार्यक्रम दि. ११ मार्च १९८९ रोजी बिर्ला सभागृहात लोकसभेचे सभापती श्री. बलराम जाखर यांच्या हस्ते झाला. त्या दिवशीच्या 'लोकसत्ते'त लिहिलेला हा अग्रलेख.*

ज्येष्ठ कवी आणि श्रेष्ठ माणूस श्री. कुसुमाग्रज यांना ज्ञानपीठ पुरस्कार करण्याचा सोहळा शनिवारी मुंबापुरीत साजरा होत आहे. गोंदातटाकीचा हा व्रतस्थ भगीरथ खुष्कीच्या मार्गाने मजल दरमजल करीत समारंभ स्थानी येईल तेव्हा होणारा टाळ्यांचा कडकडाट आताच कानी ऐकू येऊ लागला आहे. कवी कुसुमाग्रजांना आणि नाटककार शिरवाडकरांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला, तेव्हा त्यांनी मराठी साहित्याचा गौरव म्हणून तो स्वीकारला. तर मराठी रसिकांना तो आपलाच गौरव वाटला. याचे कारणच असे की कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिभासंपन्न साहित्याने रसिकांची केवळ मने रिझवलेली नाहीत तर उच्च उदात्त अशा ध्येयवादाची एक पेटती ज्योत नव्या लेखकांच्या, सामाजिक कार्यकर्त्यांच्या, विचारवंताच्या अडखळणाऱ्या, धडपडणाऱ्या विविध

स्तरांवरील सामान्य माणसाच्या हृदयात तेवत ठेवण्याचे त्यांचे कार्य अखंड चालूच आहे १९७२ मध्ये कै. वि. स. खांडेकरांना हा बहुमान मिळाला होता. त्यानंतर १६ वर्षांनी हे भाग्य मराठी साहित्याच्या वाट्याला आले. याबद्दल पुष्कळ लिहिले गेले आहे, परंतु त्यामधील एका महत्वाच्या दुव्याचा उल्लेख करावयास हवा. खांडेकरांनंतर नव्या लेखकांना, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना, दलित समाजातील जागृत मुलाबाळांना पित्याचे छत्र दिले ते कुसुमाग्रजांनीच. लेखक अगर कवी म्हणून ती व्यक्ती वाचकासमोर पुस्तकरूपाने असते. काहीजण आपल्या वागणुकीने समाजहितचिंतक या नात्याने आपले प्रभावक्षेत्र निर्माण करतात. खांडेकरांनंतर असे श्रेष्ठत्व प्राप्त झालेले लेखक म्हणून आज सारेजण कुसुमाग्रजांचे नाव घेतात.

**परिवर्तनाचा साक्षीदार**

पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे गेलेल्या परिवर्तनाचे अनेक चढउतार असलेल्या एका भव्य कालखंडाचे जागृत साक्षीदार म्हणजे कुसुमाग्रज आहेत. लेखक अगर कवी आपल्या प्रतिभेने त्यामधून काय उचलतो आणि जगापुढे मांडतो यावरच केवळ अशा लेखक साक्षीदाराचे महत्त्व असत नाही. तर त्याच्या वैचारिक जडणघडणीशी त्याचे मोठेपण निगडित असते. रशियन क्रांतीने जेथे श्रीमंत नेहरूंना मार्क्सवादाचे आर्कषण वाटले, तेथे कुसुमाग्रजांना वाटले तर नवल नाही. त्यामधून जनसामान्यांच्या सुखदु:खांचे गीत गाणारा कवी, लढणाऱ्यांना समर्थ शब्दांची कवचकुंडले बहाल करणारा कवी असे त्यांचे रूप झाले. महात्मा गांधींच्या वैचारिक प्रभावातून त्यांनी गांधीवाद घेतला नाही, परंतु अहिंसेचे ते पुजारी झाले. देशान्तर्गत कोणत्याही अन्यायाविरुद्ध लढताना हाती शस्त्र धरणे त्यांना मंजूर नाही. स्वातंत्र्यलढा चालू असताना त्यांनी क्रान्तिवीरांसाठी कविता लिहिल्या आणि स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे धिंडवडे काढणाऱ्यांवर कोरडे ओढण्यासाठी त्यांनी कविता लिहिल्या. सामाजिक समतेच्या संबंधात कसलीही तडजोड स्वीकारली नाही. त्यांच्या मुखात सतत श्रीरामाचे नाव आहे, परंतु त्या भक्तिभावालाही बुद्धिवादाची जोड आहे. त्यातही पुन्हा सर्वांत महत्वाचे स्थान आहे, ते मनुष्य म्हणून करावयाच्या व्यवहारांना.

**अलिप्त जीवन**

शेक्सपियर आणि राम गणेश गडकरी या दोघांच्या उत्कट प्रभावातून शिरवाडकर हे नाटककार जन्माला आले. पौराणिक आणि ऐतिहासिक घटनांवर आधारितच नाटके त्यांनी अधिक लिहिली. परंतु त्यातही मानवी व्यवहारांना त्यांनी दिलले स्थान हे शेक्सपियरच्या मुशीतील आहे. एका ताज्या मुलाखतीत शिरवाडकरांनी म्हटल्याप्रमाणे 'कौंतेय' मध्ये कर्ण मैत्रीला जागतो आणि मातेच्या नात्यासाठी मरण पत्करतो. 'दुसऱ्या पेशव्या'त येणारा पहिल्या बाजीरावाचा लढा ब्राह्मण्याशी आहे, आणि त्यामुळे ते नाटक एक सामाजिक आशय घेऊन उभे राहते. शेक्सपियरची इतर नाटके वेगवेगळ्या स्वरूपांत शिरवाडकरांनी आणली, परंतु 'हॅम्लेट'चे रूपांतर त्यांनी करावे ही अपेक्षा मात्र एका परीने अपुरी राहिली तर दुसऱ्यापरीने 'नटसम्राट'ने जेव्हा कळस चढविला तेव्हा सह्याद्रीच्या सर्वोच्च शिखराने, कळुसबाईनेही मान डोलावली. वाङ्मयीन मोठेपण, समाजाभिमुखता यांबरोबरच त्यांच्या आणखी एका सद्‌गुणाने त्यांच्याभोवती एक वलय निर्माण केले, ते आहे त्यांच्या निस्संगपणाचे. समाजाला इतके देणाऱ्या लेखक-कवीने सरकारकडून आणि समाजाकडूनही काही न घेण्याची भावना अहंकाराशिवाय जोपासावयाची ही साधी गोष्ट नाही. 'दूरचे दिवे' या त्यांच्या पहिल्या नाटकाला धुलाईचे कपडे वेळेवर न मिळाल्याने ते हजर राहिले नाहीत. परंतु पुढे कपडे मिळूनही ते आले नाहीत असे घडले आहे. याचे प्रमुख कारण अलिप्तपणे जगण्याची एक अनिवार ओढ. साहित्य संस्कृती मंडळाने १० हजारांचा पुरस्कार त्यांना न विचारता जाहीर करताच, त्याला नकार देणारे ते शेवटी एकमेव सहित्यिक. सरकारच्या छायेत तर ते कधीच उभे काहिले नाहीत. कै. यशवंतराव चव्हाणांनी 'विमानातून चला', असे म्हटले तर 'रेल्वेने येतो' असे उत्तर देणारे शिरवाडकर आजच्या जमान्यात दुर्मिळ झालेल्या या गुणांनीच लोकांचे दैवत बनले आहेत. गावातील लोकांनी 'ग्रामदैवत' म्हणून त्यांच्यावर प्रेम करावे आणि साहित्य वारकऱ्यांचा विठोबा होऊन शिरवाडकरांनी उभे राहावे हा मराठी साहित्य जगातील एक अद्‌भुत पण अर्थ सांगता येणारा चमत्कार आहे.

**कोलंबसाचे स्वागत :**

मराठी साहित्याचा गौरव घडवून आणणाऱ्या या कोलंबसाचे म्हणून मुंबापुरीत मन:पूर्वक स्वागत! सामान्य माणसाच्या 'Wisdom' वर आपला विश्वास आहे, असे उद्गार त्यांनी एका ताज्या मुलाखतीत काढले आहेत. परंतु हल्ली सामान्य माणसे लढेनाशी झाली आहेत. नव्या पद्धतीत स्वत:ला बसवू पाहात आहेत. भ्रष्टाचाराशी जुळवून घेत आहेत. शिरवाडकर अलिप्त राहून ज्या पद्धतीने जीवन जगले ते सर्वांना शक्य नाही. सामाजिक समतेची लढाईही एकांगी बनताना दिसते आहे. राजकारणातील भेदाभेद, सत्तेचे होत चाललेले केंद्रीकरण आणि त्यात उपकाराचे तुकडे फेकून लाचार बनविण्यासाठी चाललेले प्रयत्न पाहिले की सामान्य माणसाच्या शहाणपणाला फार मोठे आव्हान उभे आहे असे वाटते. तेथे कुसुमाग्रजांची कविताच उपयोगी पडेल. म्हणून या गौरवात भाग घेताना त्यांच्या कवितेशी असलेले नाते प्रत्येकाने जपले पाहिजे. 'मातीची दर्पोक्ती' या कवितेतील दर्पोक्ती खरी करणे शेवटी या सामान्य माणसाच्या हाती आहे. कवीने लिहिले आहे,

'ही क्षुद्र बाहुली कोण करी
निर्माण?
बेताल नाचवी, सूत्रधार हा
कोण?
मातीतच अंती त्याचेही निर्वाण?
स्वामित्व जगाचे खरे तुमच्या हाती!'

त्या स्वामित्वासाठी हे आवाहन! माणसाच्या विजयाचा हा उत्सव!!

५

# तुमची सर्व भाषणे ही क्रांतिगीते ठरोत!

*मुंबईतील साहित्य आणि समाजसेवी संस्थांच्या वतीने कवी कुसुमाग्रजांचा सत्कार दि. २४ एप्रिल १९८९ रोजी विलेपार्ले या उपनगरात प्रचंड जनसमुदायासमोर साजरा झाला. त्या दिवशी त्यांना केलेले हे एक आवाहन. 'धनुर्धारी' त एके काळी श्री. शिरवाडकर ज्या पद्धतीचे पत्रलेखन करीत होते, त्या परंपरेत लिहिलेले.*

कवी कुसुमाग्रज यांसी,

सप्रेम नमस्कार.

'धनुर्धारी' साप्ताहिकात काम करीत असताना तुम्ही 'सप्रेम नमस्कार' हे सदर लिहीत होता. कै. प्रभाकर पाध्ये यांचे स्टॅलिनला इशारा देणारे लेख, मालवणच्या म्हापणकरांचे भविष्य आणि तुमचे पहिल्या पानावर येणारे 'सप्रेम नमस्कार' हे सदर यामुळे धनुर्धारी अतिशय लोकप्रिय झाला होता. तरीसुद्धा धनुर्धारी हे साप्ताहिक भविष्यामुळेच जास्त खपते असा दावा छापखान्यातील फोरमनचा असे. परंतु आज सांगितले पाहिजे की, तुमचे ते सदर त्या काळात आमच्या पिढीने अतिशय आवडीने वाचले. आज त्या सदराच्या रूपानेच मी तुमचे अभिनंदन करीत आहे.

असे सदर लिहिणाऱ्या एका पत्रकारास ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला याचा आम्हा सर्व पत्रकारांना अतिशय आनंद होत आहे. 'देवाच्या आळंदीला निघालो आणि चोराच्या आळंदीला पोहोचलो,' असे आचार्य अत्रे स्वतःच्या आयुष्याबद्दल म्हणत असत. तुम्ही 'नट होण्यास निघालात परंतु कवी झालात, तुम्ही पत्रकार होण्यास निघालात तर नाटककार झालात!' व्ही. शांताराम यांना तुम्ही एक गाणे गाऊन दाखविले होते. तेच व्ही. शांताराम आज आपल्याकडून तेच गाणे ऐकावे असे म्हणत आहेत. तुमची तयारी असेल तर तुमच्या गाण्याचा कार्यक्रम विनातबला विनापेटी राजकमल स्टुडिओमध्ये आयोजित करणे शक्य आहे. पहा जरा विचार करून. तसे तुम्ही येता-जाता गाणे गुणगुणत असताच. ते जरा मोठ्याने म्हणायचे इतकेच.

विलेपार्ल्याच्या सत्कारानंतर दि. ३० एप्रिल रोजी भारताच्या राजधानीत तुमचा सत्कार होणार आहे. त्यानंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात तुमचा आणखी एक सत्कार अपेक्षित आहे. तो कोल्हापूर येथे होईल असे कळते. या तीन सत्कारांनी तुमच्या पुढे जो आज सर्वांत मोठा पेच निर्माण केला आहे, त्याचीच आम्हाला काळजी वाटते. 'इतक्या ठिकाणी नवे आणि वेगळे काय बोलायचे' या चिंतेत तुम्ही सध्या आहात. परंतु आजपर्यंत सर्व भाषणे ज्याप्रमाणे गाजली, त्याचप्रमाणे या तिन्ही समारंभातील भाषणे गाजतील यात शंका नाही. तुम्हाला काय बोलायचे हा प्रश्न आहे, तर तुमच्याबद्दल इतके लिहून आले आहे तर नवे काय लिहायचे असा प्रश्न परीक्षक आणि निरीक्षक यांच्यापुढे आहे.

या दोन्हींना तशी उत्तरे आहेत! विलेपार्ल्याला तुम्ही याल त्या दिवशी मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची पुण्यतिथी आहे. दरवर्षी दीनानाथांचा हा स्मृतिदिन विलेपार्ल्यात मंगेशकर कुटुंबियांच्या उपस्थितीत साजरा होत आला. गतवर्षीपासून त्या कार्यक्रमाचे पुण्याला स्थलांतर झाले. कारण तेथे दीनानाथांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक मोठे रुग्णालय उभे राहते आहे. समाजाने ज्यांची उपेक्षा केली, ज्यांना लाथाडले त्या सर्वांबद्दलची कणव, आत्मीयता आणि त्याच्या त्यागाचे माल हाच तुमच्या सर्व काव्याचा आणि साहित्याचा स्थायीभाव आहे . दीनानाथ मंगेशकर हे मराठी रंगभूमीचे लोभसवाणे लेणे होते. त्यांची लतिका आणि शिवांगी

एक नाट्यरसिक आणि एक नाटककार म्हणून आजही तुमच्या डोळ्यासमोर असेल. मराठी रंगभूमीच्या या मानकऱ्याला आज तुम्ही अभिवादन करू शकाल. एकूण दिवस चांगला निवडला आहे. तुमचे भाषण ऐकण्यास आम्ही सारेच उत्सुक आहोत.

दिल्लीला जाल तेव्हा मात्र तुम्ही दुर्वास मुनीचा अवतार धारण केला तर आम्हाला अधिक आवडेल. आताच्या राज्यकर्त्यांना काही चार शब्द सुनावल्याशिवाय परत येऊ नका. आमच्या बांद्याच्या सोहिरोबा अंबियेने राज्यकर्त्यांना त्या काळात 'अंतरीच्या ज्ञानदीपाचे' स्मरण दिले, तसे करण्याची आता गरज आहे. लोकशाही , धर्मातीतता आणि अहिंसा या तीन तत्त्वांचे तुम्ही पूजक, पददलित आणि उपेक्षित यांचे तुम्ही त्राते आहात. या सर्वांनाच सत्तेचा मोह पडला आहे असे दिसते. समाजसुधारणा आधी की सत्ता आधी, हा जुना वाद पुन्हा उभा राहिला आहे आणि सत्तेच्या दिशेने सर्वांचे घोडे धावत सुटले आहेत. धर्मप्रधान राजकारणाचे नारे लावणारे जोरात आहेत. शेवटी धर्म म्हणजे तरी काय? समता म्हणजे तरी काय? आणि ज्ञान संपादन करणे म्हणजे तरी काय? हे कोणीतरी सांगण्याची वेळ आली आहे. साहित्यपांडवांतील तुम्ही युधिष्ठिर आहात. विचारवंतांतील तुम्ही तुकाराम आहात आणि समाजसुधारकांतील तुम्ही जोतीबा फुले आणि आगरकर आहात. सर्वांना एकत्र आणून महाराष्ट्र पुढे जाईल, असे काही तरी घडले पाहिजे. कवीच्या शब्दांत क्रांतीचे सामर्थ्य असते. १९४२ मध्ये तुम्ही क्रांतिगीते लिहिलीत. आता नवीन क्रांतिगीते लिहिण्याची वेळ आली आहे. तुमची ही सर्व भाषणे हीच क्रांतिगीते ठरोत.

आपला नम्र

एक वाचक, श्रोता, प्रेक्षक.

## ६
## राम पंचवटीत चिवडा विकतो आणि लक्ष्मण कविता करतो त्याची गोष्ट

**राम-लक्ष्मणाची कथा**

नांदुर्डीच्या ग्रंथालय परिषदेहून परतत होतो. नाशिक स्टँडवरची टॅक्सी पकडली होती. इतक्यात एक स्नेही आले, म्हणाले, 'जरा थांबा, एकाची ओळख करून देतो'. ते आले ते चिवड्याचे पॅकेट घेऊनच. नाव धर्मराज पाटील, महाभारतातील धर्माचे नाव घेतलेले हे धर्मराज एकेकाळी चित्रपटात रामाचे काम करीत होते. धर्म आणि राम यांचा आयुष्यात संयुक्त प्रयोग वाट्याला आलेले श्री. पाटील म्हणाले, 'सती सुलोचना चित्रपटात मी राम होतो आणि आपले तात्यासाहेब लक्ष्मण!'

ते शब्द ऐकून मी टॅक्सीतून खालीच उतरलो. तात्यासाहेब म्हणजे कवी कुसुमाग्रज चित्रपटात काम करीत होते आणि लक्ष्मण झाले होते, हे ऐकूनच थबकलो. 'हल्ली काय करता?' मी विचारले.

'पंचवटीत चिवडा विकतो.......' नाशिकचा राम चिवडा विकतो आणि लक्ष्मण कविता करतो.

सारे हसलो.

'त्या वेळचा फोटो आहे का?' मी विचारले. पुन्हा रामचंद्र नम्र झाले आणि फोटो असल्याची बातमी त्यांनी दिली.

आणि कबूल केल्याप्रमाणे तो फोटो त्यांनी माझ्याकडे पाठविला. नाशिकचे श्री. कारंजकर यांचीही या कामी फार मदत झाली .

१९३५ मध्ये तयार झालेल्या 'सती सुलोचना' या चित्रपटातील हे छायाचित्र आहे. रामाच्या भूमिकेत धर्मराज पाटील, लक्ष्मणाच्या भूमिकेत कवी कुसुमाग्रज आणि सती सुलोचनेच्या भूमिकेत इंदूबाला नावाची कुणी 'बाला' आहे. पंचवटीचे श्री. एल. एस. जाधव यांनी घेतलेले हे छायाचित्र आहे.

१९३५ मध्ये लक्ष्मणाच्या भूमिकेत अतिशय देखणे दिसणारे कवी कुसुमाग्रज फक्त २३ वर्षांचे होते. २७ फेब्रुवारी १९१२ हा त्यांचा जन्मदिन. शनिवारी ७६ वर्षांची वाटचाल पूर्ण करून ते ७७व्या वर्षात पदार्पण करतील, परंतु जे त्यांना जवळून ओळखतात ते त्यांचे अभिनंदन करण्यासाठी शनिवारी घरी जाणार नाहीत. कारण वाढदिवसाच्या दिवशी ते कधीच घरी राहात नाहीत. गेल्या बुधवारीच लक्ष्मणाची स्वारी मित्रांसमवेत एका स्टेशन वॅगनमधून बाबा आमटे यांच्या भ्रमरागडला गेली आहे. अर्थात तिथपर्यंत नक्की गेले तर तेथे गेले असे समजायचे. वाटेत स्वाऱ्या कुठे वळणारच नाहीत असे काही नाही. ज्या प्रवाशाचे सारे जीवनच एक लहरयात्रा आहे, त्यांचे काय सांगावे. येतो सांगून न येणारे, येण्याची आशा नसताना हजर राहणारे असे हे कवी कुसुमाग्रज आज सर्वांना इतके प्रिय का, हा प्रश्न मला नेहमी पडतो. त्यांचा नि:संगपणा हे त्याचे प्रमुख कारण असले तरी त्यांचे श्रेष्ठ साहित्यलेखन यात त्यांच्याबद्दल आदराचे सारे मूळ आहे. कवी कुसुमाग्रजांची कविता म्हणजे अस्सल पैठणी आहे. तेथे पोत कमी असणार नाही, याचा जाणत्यांना विश्वास आहे. पुन्हा आयुष्य कोणत्याच अपेक्षांसाठी त्यांनी न घालविल्यामुळे तुकारामाचा अंतरात्मा आणि ज्ञानदेवाचा विचार-कमंडलू त्यांच्यापाशी आहे. बहुसंख्य लेखकांप्रमाणे ते स्वत:विषयी कधीच बोलत नाहीत. आणि त्याचबरोबर कोणत्याही गैरहजर लेखकाबद्दल अगदी निकटच्या मित्रांतही वाईट बोलत नाहीत.

या युगाचा हा साहित्यक्षेत्रातील शककर्ता पुरुष आहे. गेल्या

रविवारीच ते दूरदर्शनवर दिसले तेव्हा अनेकांना आश्चर्य वाटले. 'प्रतिभा आणि प्रतिमा' मध्ये त्यांना आणण्याचे अनेकांचे प्रयत्न फसले. तेव्हा श्री. विजय तेंडुलकरांनी त्यांना 'दिंडी'त आणले. तेही श्री. तेंडुलकरांमुळे आले. दुसऱ्या कुणाला त्यांनी तशी दाद दिली नसती. 'बघू, करू' हे त्यांचे आवडते उत्तर असते.

**गौरवाचे गर्वहरण**

संगीत नाटक अकादमीने त्यांचा नुकताच गौरव केला. त्यांच्यापेक्षा कर्तृत्वाने काहीच नसलेल्यांचा गौरव यापूर्वी झालेला. हासुद्धा गौरव झाला नसता. त्यांच्या चहात्यांनी कागदपत्र तयार केले,त्यांना पत्ता लागू न देता ते दिल्ली संगीत नाटक अकादमीकडे पाठविले, आणि हा गौरव त्यांना प्राप्त करून दिला. त्याबद्दलचे सत्कार नाशिकपुरते त्यांनी स्वीकारले. आणि प्रत्यक्षात ते 'ॲवॉर्ड' घेण्यासाठी कलकत्यास गेलेच नाहीत. कुणी तरी ते घरी आणून दिले तर ते घेतील आणि ठेवून देतील. त्यांच्याशिवाय कुणीही नसलेल्या त्या घरात संगीत नाटक अकादमीचेही गर्वहरण झालेले असेल. गौरवांचे आणि किताबतींचे गर्वहरण होते असे हे स्वयंभू संस्थान. कुणीही खालसा करू न शकणारे.

ज्यांना पद्मभूषण दिले असते तर त्या सन्मानाचे माहात्म्य वाढले असते अशा कुसुमाग्रजांना काही द्यावे असे सरकारनेही कधी ठरविले नाही. आणि त्यांनी उद्या तसे काही ठरविले तरी उपयोग नाही. कारण कविराज त्यास तयार होतीलच याची खात्री नाही. साहित्य अकादमीनेही कवी म्हणून त्यांचा गौरव केला नाही. 'नटसम्राट' चे लेखक वि. वा. शिरवाडकर यांचा गौरव साहित्य अकादमीने केला, पण श्रेष्ठ कवी तसाच राहिला. त्याबद्दल त्यांना कसलाच खेद अगर खंत नाही, असे लोकांना वाटते. परंतु ते पूर्ण खरे नाही. अंतर्यामी हा कवीही काही गोष्टींनी दु:खी होतो. पण स्वत:चे दु:ख ओंजळीत घेऊन तो कधीच उभा राहात नाही, त्यामुळे त्या दु:खाच्या निवारणाचाही विचार होत नाही. कुणालाही तो ते कधीच करू देणार नाहीत. कवीचे घर ओके आहे, पण मन भरलेले असल्याने मित्र आले की ते हसतात. सभा, संमेलनात बोलायला लागले की बरोबर चबुतरा गाठतात, ऐकणारे तृप्त होतात. मनाची विहीर काही क्षणांपुरती रिकामी होते, पुन्हा भरण्यासाठी.

१९८७ मध्ये कुसुमाग्रजांनी पंचाहत्तरी ओलांडली तेव्हा श्री. पुरुषोत्तम पाटीलसंपादित 'कविता-रती'ने कविराजांवर दोन खंड प्रसिद्ध केले. 'चंदनाचे पायी। ठेविता मस्तक। शीतळून दु:ख। सुगंधतो।।', या भावनेने श्री. पाटील यांनी सारे केले. 'स्मृती' या कुसुमाग्रजांच्या कवितेचे वर्णन 'एक चंदनी उदबत्ती' असे श्रीमती इंदिरा संतांनी आपल्या लेखात केले. 'कवितावाचनात वाचकही निर्मितिक्षम असतो, असायला हवा', असे इंदिराबाई म्हणतात ते अशा वेळी अगदी खरे वाटते. प्रेम-कविता आणि ध्येय-आकांक्षांच्या कविता यांची अशी सरमिसळ झाली आहे की प्रतिमांचे अर्थ लावतानाही मन गोंधळून जावे. 'काढ सखे, गळ्यातील तुझे चांदण्याचे हात' असे 'स्वप्नाच्या समाप्ती'त लिहिणारे कुसुमाग्रज 'काही बोलण्याचे आहे, पण बोलणार नाही, देवळाच्या दारामध्ये भक्ती तोलणार नाही', असे म्हणतात त्या वेळी हा प्रवासी कुणाच्या दारात नेमका उभा आहे याचा संभ्रम पडतो. कारण कुसुमाग्रजांचे मनही 'आस्तिक आणि नास्तिक ह्या परस्परविरुद्ध जाणिवांमध्ये' घोटाळतच असते.

'मूळ प्रश्न माझा
योजनेवाचून
गोंधळ हे भव्य
केलेस तू कसे?'

हा त्यांचा 'प्रश्न' अनुत्तरितच राहिला आहे. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने नाशिकला कविसंमेलन झालं. तेव्हा त्यांनी आपले 'मनोगत' कवितेतच सांगितले.

'सत्कार हे नारदासारखे चतुर आणि इंद्रासारखे बहुरूपी असतात'. अशी टीकाटिपणी करीत कविराज म्हणाले,

'मित्रहो, अखेर माणसाचं आयुष्य म्हणजे लक्षावधी संबंधांनी विणलेलं जमिनीशी बांधलेलं एक जाळं.......'

हा लेख तुम्ही वाचाल तेव्हा ते जाळं कदाचित् भ्रमरागडला पोहोचलेलं असेल. आश्चर्य इतकेच वाटते की ते जाळं दूर असूनही आपणही कसे त्या जाळ्यातच आहोत असे वाटते.....

७.

## गोदातटाकीचा मराठीचा भगीरथ

ज्ञानपीठ पुरस्कार मराठीतील लेखकाला मिळाल्यामुळे मराठी भाषेला आणि साहित्याला सुवर्णाचे मोल प्राप्त झाले आणि इंग्रजीच्या आक्रमणाखाली दबल्या जाणाऱ्या मराठी मायभाषेला फार मोठा कैवारी कुसुमाग्रजांच्या रुपाने मिळाला. ज्ञानपीठ पुरस्काराच्या मुंबईतील समारंभात त्यांनी इंग्रजीच्या आकर्षणात गुलामी वृत्ती कशी दडलेली आहे, तिचा त्याग करा, हे आवर्जून सांगितले. लोकांनी टाळ्या वाजविल्या, परंतु त्यामुळे परिवर्तनाची प्रक्रिया सुरु झाली, असे काही अजून घडलेले नाही. परंतु जागतिक मराठी परिषदेच्या व्यासपीठावरुन ते पुन्हा या भूमिकेचा पुनरुच्चार करतील, तेव्हा मराठी भाषेच्या या राज्यातील मराठी नागरिकाला आपले सत्व कशात आहे, याची जाणीव होईल अशी अपेक्षा आहे. मराठी भाषेचा निस्सीम भक्त या नात्याने त्यांनी यापूर्वीही अनेकदा ही भूमिका मांडलेली होती. गोदातटाकी एक व्रतस्थ भगीरथाप्रमाणे वावरणारे कुसुमाग्रज मराठी भाषेच्या व्रताबद्दल तटस्थ नाहीत. ते चांगले आक्रमक भूमिका घेऊन सदैव उभे राहिलेले आहेत. 'लोकांना न समजणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही हे अद्‌भूत

नवल या देशात घडत आहे', हे त्यानी पूर्वीही सांगितले होते आणि मुंबईच्या समारंभातही ठासून सांगितले. 'हे मायभाषेचे संकीर्तन मी करतो आहे, ते केवळ तिच्यासंबंधी मला वाटणाऱ्या काव्यात्मक प्रेमामुळे नव्हे. मायभाषेचा आश्रय घेतल्याशिवाय समाजातील सर्व लौकिक व्यवहारांमध्ये तिची प्रतिष्ठापना केल्याशिवाय समाजाची सर्वांगीण प्रगती अशक्य आहे', ही भूमिका कै. प्रभाकर पाध्ये यांच्याबरोबर झालेल्या एका वादात त्यानी मांडली होती. दि. १७ व १८ ऑक्टोबर १९६९ रोजी नाशिक येथे पहिले इंग्रजी हटाव संमेलन झाले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष शिरवाडकर होते. आणि त्यानी लोकशाही समाजधारणे-साठी इंग्रजीच्या उच्चाटनाची मागणी केली होती. ते सारे पुन्हा करण्याची गरज आहे. ज्ञानपीठ पुरस्कारामुळे कवी कुसुमाग्रज आपली एकाकीपणाची कवाडे खुली करून एकदम बाहेर आले, जनलोकात मिसळले हे फार चांगले घडले. त्यात खांडेकरांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा झाला नाही इतका गाजावाजा कुसुमाग्रजांना तोच पुरस्कार मिळताच झाला आणि त्यांच्यावर लेखांचा पाऊस पडला. कितीतरी पुस्तके नव्याने प्रसिद्ध झाली. कुसुमाग्रजांचे एखादे तरी पुस्तक आपल्या घरी असावे असे प्रत्येकाला वाटू लागले. कुसुमाग्रजांच्या या ज्ञानपीठ पुरस्कारात मराठी भाषेच्या पुनरुत्थानाचे तेज:कण आहेत. याचे कारण असे की हा मराठी भाषेचा कैवारी सच्चा आहे.

कुसुमाग्रजांचा माझा संबंध तसा १५-२० वर्षांचा. परंतु ते गोव्यात आले तेव्हापासून स्नेह जमला. ज्या 'कोकेरो'त चार्ल्स शोभराजला अटक झाली, त्या पर्वरीतील 'कोकेरो'त कुसुमाग्रज-बा. भ. बोरकर यांच्याबरोबर संयुक्त मैफल झाली. दि. २६ सप्टेंबर १९४२ रोजी कविवर्य बोरकरांनी गोव्यातील केपे गावी कुसुमाग्रजांवर एक कविता लिहिली होती. 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' ही कविता वाचून बाकी बा. भ. बोरकरांनी लिहिले :

**'हा भागीरथीचा ओघ,**
**दिव्य शब्दांचा,**
**यज्ञदग्ध उज्वल अश्रूंचा, रक्ताचा।'**

मैफलीत तात्यासाहेब शिरवाडकर हिमालयासारखे शांत होते.

नीरवतेची आवड ही त्यांची मुळातील असावी. तेव्हापासून त्यांच्या आवडीनिवडीशी माझा परिचय झाला. त्याना मोटारीतून फिरणे फार आवडते. रेल्वे स्टेशन, विमानतळ म्हणजे त्यांच्या हिशेबी शत्रूच्या छावण्या. साहित्य अकादमीचा 'नटसम्राट' नाटकाला मिळालेला पुरस्कार स्वीकारण्यासाठी ते दिल्लीस गेले तेही मोटारीतून. रात्रीचा प्रवास अधिक पसंत. मित्र श्री. शिवाजी पाटील चक्रधर असला की तात्यासाहेब कितीही लांब जातील. दिल्लीला जाताना ते थांबत गेल्याने उशीर होण्याची वेळ आली. थंडीचा कडाका होता. एक गरम कोट हातावर आणि मोटारीच्या स्टिअरिंगवर टाकून नाटककाराच्या शिवाजीने गाडी चालविली आणि सूर्यप्रकाशाबरोबर दिल्लीत पोहोचविले.

२७ फेब्रुवारी १९१२ हा त्यांचा जन्मदिन. त्यांच्या जवळच्या मित्रांना सारे माहित असल्याने वाढदिवसाच्या दिवशी पुष्पगुच्छ अगर पुष्पमाला घेऊन त्यांच्या घरी त्यापैकी कुणी जाणार नाही. याचे कारण कुसुमाग्रज म्हणजे आपल्या वाढदिवसाची छपन्न छायाचित्रे पाठविणारे मंत्री नाहीत. गावोगाव आपले वाढदिवस मित्रमंडळींतर्फे साजरे करुन घेणारे किंचित लेखक नाहीत. वाढदिवसाच्या दिवशी घरी न रहाणारा हा कलंदर कवी सत्काराचा शत्रू आहे आणि उपेक्षितांचा मित्र आहे, हे त्यांचे मित्रच जाणतात. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाने त्याना न विचारता दहा हजारांचे दान जाहीर केले. तुकारामाच्या निरीच्छतेने चुकून अंगावर पडलेले झुरळ झटकावे तसे त्यानी ते दान झडकून टाकले.

प्रा. वा. ल. कुलकर्णींचे कुसुमाग्रज हे अतिशय आवडते. तसे ते कुणाचे आवडते नाहीत? परंतु या उभयतांत नाशिकचे नाते आहे. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाची ही दहा हजारांची 'बक्षिसी' जाहीर झाली तेव्हा श्री. वा. लं.च्या पत्नी त्यांना म्हणाल्या, 'अहो, शिरवाडकरांना अभिनंदनाचं एक पत्र तरी टाका.'

श्री. वा. ल. उत्तरले, 'त्या कवीला मी चांगला ओळखतो. अभिनंदनाची अशी घाई नको. दोन दिवस मी थांबणार आहे.'

श्री. वा. लं.नीच ही हकिगत मला सांगितली व म्हणाले, 'दुसऱ्या दिवशी त्यांनी ते पैसे अव्हेरल्याची बातमी आली, आणि मग मी पत्नीस म्हटले की यासाठी मी थांबलो होतो.'

निवडक मित्र, निवडक जीवन हा खरा कुसुमाग्रजांचा स्थायीभाव आहे. परंतु वयोमानाच्या उन्हाळीने हिमशिखरावरचे बर्फ तसे वितळू लागले आहे. नाशिककराला त्यांच्या घरी तसा कधीच मज्जाव नसतो. कंटाळा आला की आपल्या दोन निवडक मित्रांना घेऊन त्र्यंबकेश्वरला जातात किंवा जव्हारला. या ज्येष्ठ कवीबरोबर आठवणीत राहण्याजोग्या तीन मैफली झाल्या. पहिली गोव्यात झाली. त्यानंतर दोन मैफली नाशकात झाल्या. आपल्या सभोवतालच्या परिसराशी पूर्णपणे समरस झालेला हा कवी आहे. नाशिकच्या एका मैफलीत पावसाळ्यातील त्र्यंबकेश्वराबद्दल कुसुमाग्रज धुवांधार पावसासारखे बोलत होते. 'तुम्ही कधी उलटे धबधबे पाहिलेत?' शिरवाडकरांनी विचारले. 'पावसाळ्यात त्र्यंबकेश्वराला इतका वारा असतो की कोसळणाऱ्या धबधब्यांना तो पुन्हा उचलतो व आसमंतात नेतो. ते पाहण्यासाठी या.'

कुसुमाग्रज हा माझा अनेक वर्षांचा कुतुहलाचा विषय होता व अजूनही आहे. ताजमहाल एकदा पाहिल्यावर त्यामधील पहिले औत्सुक्य संपते. प्राणहीन वस्तूलाही सौंदर्याने जिवंतपणा येतो तर काही नामवंत व्यक्ती अशा असतात की त्यांच्या पहिल्या भेटीनेच औत्सुक्य निकालात निघते. कवी कुसुमाग्रजांचे सारेच उलटे. ते स्वत: खाजगी गप्पातही कुणाबद्दल काही वाईट बोलत नाहीत. वैयक्तिक निंदा तर ते कधीच कुणाची करीत नाहीत. ज्या गावात लेखक राहतो, त्या गावातील लोक लेखकाबद्दल चांगले बोलतातच असे नाही. आपल्या गावाचे भूषण म्हणून त्याची काळजी घेतात असे क्वचितच पाहावयास मिळते. नाशिकमध्ये कुसुमाग्रज म्हणजे सर्वांचे दैवत आहे. अनेकांचे ते पालक आहेत. असंख्यांचे ते मार्गदर्शक आहेत. पुन्हा ते स्वत: मात्र एकाकी आहेत. पटेलनगरमध्ये ते स्वातंत्र्याची प्रभात होण्यापूर्वी राहायला आले. 'स्वातंत्र्यदिन आम्ही या घरात साजरा केला' असे एका भेटीत कुसुमाग्रज म्हणाले, परंतु आज त्या घरात त्यांच्याशिवाय कुणी नाही. पत्नी, मुले यांचे अस्तीत्व, फुलांची कोमलता आपल्या नावातच धारण करणाऱ्या कवीच्या बागेत नाही. कोणत्याही माणसाला असे एकाकीपण खायला उठेल, कुसुमाग्रजांनाही ते कधी कधी अस्वस्थ करते. परंतु या कलंदर माणसाचे सारी जीवनच वेगळे आहे. रात्री कधीही लौकर झोप न येणारा

हा कवी सकाळी ११ शिवाय उठत नाही. 'फिरायला जाण्याचा लोक मला उपदेश करतात, परंतु सकाळी ११ नंतर फिरायला जाता येत नाही. याचा विचार लोक करीत नाहीत!' कवीची त्यावरील प्रतिक्रिया. सारे लेखन रात्री. 'इतर वेळा कॉप्या करतो'. ते एकदा गंमतीने म्हणाले. जुने लेख, जुन्या कविता, जुनी पुस्तके त्यांच्या नव्या आवृत्त्यांत ते कधीकधी गुंतून जातात.

परंतु एक गोष्ट त्यांनी बैठकीत मान्य केली. गेल्या १० वर्षांत आपल्यात पुष्कळ बदल झाला. 'आता माणसे आलेली, केव्हाही आलेली मला आवडतात. काही वेळेस कुणी आले नाही तर मी अस्वस्थ होतो.'

माणसांचा चाहता असा हा कवी, लेखक, नाटककार सत्कारांचा व समारंभाचा मात्र अगदी तिटकारा करतो. प्रा. वा. ल. कुलकर्णी कुसुमाग्रजांचे मोठे चाहते असूनही म्हणतील, 'कुसुमाग्रजांच्या अध्यक्षपदाचे काही सांगू नका. लाँड्रीतील कपडे आलेले नाहीत या सबबीखाली ते एकदा एका प्रमुख कार्यक्रमास आले नाहीत.' क्रांतीचा जयजयकार करणारा हा कवी एखाद्या कार्यक्रमाची शृंखलाही आपल्या पायात बांधावयाला तयार नसतो. आमच्या एका मैफलीत शिरवाडकरांचे निकटचे मित्र श्री. शिवाजीराव पाटील 'ट्रॉपिक ऑफ कॅन्सर' हे गाजलेले पुस्तक घेऊन आले व त्यामधील एक परिच्छेद त्यांनी वाचून दाखविला. त्यामधील ती व्यक्ती समाजाला हेच प्रश्न विचारते, 'माझा तुम्ही वेळीअवेळी येऊन वेळ का घेता? मी तुम्हाला भेटलेच पाहिजे अशी सक्ती का? समारंभ व सत्कार यांच्या त्या नकली गर्दीत मला का ओढता?' अशा आशयाच्या या सुंदर परिच्छेदात एका परीने कुसुमाग्रज दिसले. परंतु या एकाकी जीवनातून ते आता बरेच बाहेर आले असले तरी कुणातही मिसळून जाणारे हे व्यक्तिमत्त्व नाही. त्यांच्या कुटुंबियातही त्यांना मानाचे स्थान आहे, गावातही त्यांची शान कायम आहे व साहित्य क्षेत्रातही त्यांचे सिंहासन वर्षे व वाद यांचे अनेक कडे कोसळले तरी कायम आहे. याचे कारण एकच. त्यांची ही एका परीने अलिप्त वागणूक. केवळ व्यक्तिपुरती ती मर्यादित नाही तर समाजात निर्माण झालेल्या व सतत होत राहणाऱ्या सर्व अभिलाषांपासून त्यांनी मिळविलेली मुक्ती. 'मानवतेचे कवी' म्हणून त्यांचे वर्णन वि. स.

खांडेकरांनी, 'विशाखा' हा त्यांचा काव्यसंग्रह स्वत: संपादित केला, स्वखर्चे प्रसिद्ध केला, त्यावेळी लिहिलेल्या प्रस्तावनेत केले. आज क्षणोक्षणी उध्वस्त होत चाललेल्या अनेक मानवी मूल्यांचा साहित्यक्षेत्रातील एकमेव रक्षणकर्ता म्हणून कुसुमाग्रजांचे नाव समोर येते. हा केवळ मानवतेचा कवी उरलेला नाही, हा मानवतेचा आज संरक्षक बनला आहे. प्रत्येक गोष्ट 'हवी' म्हणणाऱ्या समाजातील हा एकमेव 'नाही' म्हणणारा माणूस आहे. त्यांना पूर्वीही काही नको होते. आज ही काही नको आहे. ज्ञानपीठ पुरस्कारासह कोणताही पुरस्कार मिळावा यासाठी त्यांनी कधीच, कसलीच खटपट केली नाही. त्या पुरस्काराला त्यानी 'नाही' म्हटले नाही, इतकेच सर्वांचे नशीब!

श्री. वसंतराव कानेटकर हे त्यांचे जिवलग मित्र. मित्रासाठी कोणताही दोष पत्करणाऱ्या या कवीने केवळ कानेटकरांच्या उमेदवारीमुळे श्रीमती मालतीबाई बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मुंबई संमेलनास पाठिंबा दिला नाही अशी आमची एक समजूत. 'रायपूरकरांनी कानेटकरांना उभे राहण्याचा आग्रह केला म्हणून वसंतराव उभे राहिले व त्याचा तपशील मला माहीत आहे,' असे ते बैठकीतही म्हणाले. श्री. कानेटकर अध्यक्ष झाले असते तरी कुसुमाग्रज रायपूरला गेले असते असेही नाही. एकूण दोघेही शेवटी गेले नाहीत; परंतु हे दोघे मिळून एक नाटक मात्र लिहीत होते. शिरवाडकर-कानेटकर यांचे संयुक्त नाटक गौतम बुद्धाच्या जीवनावरचे आहे. अर्थात ते कधी पुरे होईल हे गौतमबुद्धाच्या बुद्धीपलीकडचे आहे, असे त्याचे वर्णन कुसुमाग्रजांनी केले. ते म्हणाले 'पहिला अंक पूर्णपणे डोळ्यासमोर आहे. डॉ. आंबेडकरांनी गौतमबुद्धाचे जे चरित्र लिहिले आहे ते आमच्यासमोर आहे. एक प्रेतयात्रा, एक जर्जर म्हातारा वगैरे दिसल्यामुळे गौतमाने राज्य सोडले व तो बौद्ध झाला या भाकडकथांना डॉ. आंबेडकरांनी आपल्या चरित्रात मुळीच स्थान दिलेले नाही. गौतमाने सर्वसंग परित्याग केला तो यापेक्षा वेगळ्या कारणांमुळे. आजही आपल्याकडे चालतात त्याप्रमाणे दोन शेजारी राज्यात नदीच्या पाण्यावरून तंटा निर्माण झाला व त्यामधून युद्ध उभे राहिले. हा तंटा मिटविण्यासाठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले, परंतु आपल्या राज्याचे लोकही तडजोड करण्यास तयार

नाहीत, असे त्याला दिसून आले. माणसाच्या स्वार्थाचे दर्शन त्याला या संभ्रमात पडले व त्यामुळे गौतमाने राज्य सोडले. तो रात्री गुपचुपपणेही गेला नाही. त्याची पत्नी त्याच्यासमवेत जाणार होती, परंतु ती गरोदरपणामुळे जाऊ शकली नाही. विचारपूर्वक सपत्नीक राज्यत्याग करणाऱ्या गौतमाचा या वैचारिक संघर्षाने पहिला अंक उत्तम रंगतो.

हे सर्व सांगून शिरवाडकर म्हणाले, 'पण पुढे काय? संन्यासी बुद्धाचे पुढे काय दाखवायचे?'

नाशिकच्या 'ग्रीन व्ह्यू' मध्ये गप्पा चालल्या होत्या. श्रीमती दुर्गा खोटे यांच्या नव्या पुस्तकाचा विषय निघाला. या 'ग्रीन व्ह्यू' मध्येच नानासाहेब फाटकांनी प्रयोग न होणाऱ्या जुन्या नाटकांतील संवाद शिरवाडकरांना खास म्हणून दाखविले होते. कुसुमाग्रज म्हणाले 'नट होण्यासाठी देवाचं खास देणं घेऊन जन्माला आलेले काही कलावंत असतात. नानासाहेब फाटक किंवा दुर्गाबाई हे त्यातले. फाटकांचा आवाज कितीही चढला किंवा त्यांनी तो कितीही खाली आणला तरी त्याची खुमारी कमी होत नसे. नानासाहेब फाटक यांचे उभे राहणे, त्यांचा चेहरा, त्यांचे व्यक्तिमत्त्व हे सर्व रंगभूमीसाठीच आहे असे वाटे. श्रीमती दुर्गाबाईंना त्याच तोलाचे व्यक्तिमत्त्व लाभले.'

'नटसम्राट' हे नाटक शिरवाडकरांनी नानासाहेब फाटक यांच्यावरुन घेतले हे आता सर्वज्ञात आहे. कै. फाटक 'किंग लियर'चे भाषांतर आपल्यासाठी करा असा शिरवाडकरांना आग्रह करीत होते. एक दिवस कुसुमाग्रज साहित्य संघात बसलेले असताना फाटक वैतागून त्यांच्याकडे आले. कोणत्या तरी नव्या नाटकात ते काम करीत होते व नवा विषय, नवे कलावंत व फाटक त्यांच्या तारा काही जुळल्या नव्हत्या. फाटक म्हणाले,

हे नवे लोक मला समजून घेत नाहीत, ही नवी नाटकेही काही माझ्यासाठी नाहीत.'

शिरवाडकरांनी त्या दिवशी ठरविले की, 'किंग लियर'च्या जागी नव्याशी न पटणारा नटसम्राट ठेवायचा व बाकीचे भारतीय धागेही मग सहज जुळतील! त्यामधून 'नटसम्राट' हे काव्यमय नाटक व नाट्यमय काव्य जन्माला आले. 'नटसम्राट'चा प्रयोग साहित्य संघात चालू

३३०५
२५८७६
विभाग १ घ ५ ८८



असतानाच एक दिवस नानासाहेब फाटक तारस्वरात नाट्यगृहातून खाली आले. शिरवाडकर आले आहेत, असे कळल्याने आले. फाटकांनी भरपूर मद्य घेतलेले होतेच. ते शिरवाडकरांना म्हणाले, 'तुम्ही त्या लागूंना येथे बोलवा आणि माझ्यासमोर एकदा त्यांना सांगा की, हे नाटक माझे आहे, त्यांचे नाही?' अर्थात डॉ. लागू असे कधीच म्हणत नव्हते. परंतु आपल्यावरचे नाटक लागूंचे होते आहे या कल्पनेनेही तो खरा नटसम्राट अस्वस्थ झाला होता.

'नटसम्राट' नाटक रंगभूमीवर आले तेव्हा ते एकदम लोकप्रिय झाले नाही. त्याचे मोठेपण, त्या नाटकातील बेलवलकरांची व्यक्तीरेखा, शिरवाडकरांची प्रगल्भतेच्या शिखरावर पोहोचलेली राम गणेश गडकरी थाटाची भाषा, यांचे महत्व चांगल्या समीक्षकांनी लोकांसमोर ठेवले तेव्हा गोवा हिंदू असोसिएशनने मेहनतीने बसविलेले नाटक उचलले गेले. नाटकामागेही एक जीवन नाट्य घडत असते. डॉ. श्रीराम लागूंना या नाटकात कावेरीच्या भूमिकेत श्रीमती शांता जोग यांनी जी साथ दिली ती अपूर्व होती. गोवा हिंदूच्या गाडीला अपघात झाला, ती गाडी पेटली, त्यात या श्रष्ठ कलावंत स्त्रीचे निधन झाले. त्यांची जागा घेणे ही सोपी गोष्ट नव्हती. डॉ. लागूंच्या ऐवजी दत्ता भट आले, यशवंत दत्त बेलवलकरांची भूमिका करु लागले. तरी अजून डॉ. लागूंचे काम अद्वितीय असे स्वत: नाटककारास वाटते, हे महत्त्वाचे आहे. दि. २७ मे १९८२ रोजी 'नटसम्राट'चा पहिला प्रयोग मुंबईत सादर झाला. गोवा हिंदू असोसिएशनने या नाटकाचे जवळजवळ ५०० प्रयोग केले. त्यानंतर ५०० प्रयोग झाले. आजही ते नाटक चिरंजीव स्वरूपात उभे आहे. नाटककार शिरवाडकरांची ही कलाकृती, व्यक्तीरेखा, भाषा, कथानक आणि शेवटी शोकान्तिका यापुढे मराठी रंगभूमीवर कायम टिकणार आहे. शेक्सपियरच्या तोडीची शोकान्तिका लिहीन असा पण करून लिहीणारे शिरवाडकर नाहीत. परंतु मराठी साहित्यात आतापर्यंत सर्वोत्कृष्ट शोकान्तिका म्हणनू 'एकच प्याला' चे नाव घेतले जात असे. त्याऐवजी अगर त्या बरोबरीने शिरवाडकरांच्या 'नटसम्राट'चे नाव घेतले जाईल. नाटकाच्या चिरंजीवत्वाचे एक गमक असते. अशा नाटकातील वाक्ये पिढ्यान् पिढ्या घरात उच्चारली जातात. 'तुम्ही

आमच्या पाठच्या भावासारखे', हे 'एकच प्याला' तील वाक्य संभावित जगाची निशाणी फडकविण्याचे काम वर्षानुवर्षे करीत आहे. 'नटसम्राट' मधील काही वाक्ये अशी मैफलीत आणि बैठकीत सतत उच्चारली जातात. बेलवलकर आणि कावेरीच्या एका अप्रतिम संवादात कावेरी विचारते, 'बायको मैत्रिण असूच शकत नाही का?' त्यावर बेलवलकर उत्तरतात, 'असते, असू शकतेही पण मैत्रिणीपेक्षा आई अधिक असते. दिवाणखाना कमी असातो, पण देऊळ जास्त असते. आकाश कमी असते, पण पृथ्वी अधिक असते. थोडक्यात, बायको हे एक बंदर असतं कावेरी, नवरा नावाच्या गलबतासाठी.'

पुढे एक छान परिच्छेद आहे. बेलवलकरांच्या मुखातून शिरवाडकर सर्व माणसांसाठी म्हणतात : 'पराभवाच्या जखमा किंवा विजयाचे झेंडे घेऊन ते पुन्हा बंदरात येते.' 'माणसाने समोरचे ताट द्यावे, परंतु बसायचा पाट देऊ नये.' हे कावेरीचे वाक्य तर घराघरात गेले आहे. चोरीचा आरोप आल्यानंतरच्या घटना, आणि त्याचे निराकरण झाल्यावर बेलवलकरांच्या तोंडी शिरवाडकरांनी जे एक वाक्य टाकले आहे, ते असेच मनाच्या कोंदणात कायम घर करून राहणारे आहे. बेलवलकर म्हणतात, 'सरकार, आपल्या या दीड दमडीच्या कठपुतळ्यांना न्यायासनावर बसवून, त्यांच्या कडून इन्साफ मागण्याचीच नव्हे तर निरपराध ठरण्याचीही माझी इच्छा नाही!

साहित्य अकादमीचे पारितोषिक 'नटसम्राट' नाटकाला मिळाले. परंतु शेवटी कुसुमाग्रज श्रेष्ठ की शिरवाडकर? साहित्य अकादमीचे कवितेचे पारितोषिक काही कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' ला मिळाले नाही. कारण त्या अकादमीवर एका मराठी कवीची झब्बूशाही होती. अर्थात त्याचे सोयरसुतक कुसुमाग्रजांना नव्हते व नाही. एका बैठकीत त्यांना विचारले, 'तुमचे स्वत:चे नटसम्राट हेच सर्वात आवडते नाटक की दुसरे?'

ते ताबडतोब उत्तरले, 'वीज मिळाली धरतीला!' या विजेला महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार मिळाला, परंतु लोकप्रियतेचा फारसा पुरस्कार मिळाला नाही. शिरवाडकरांच्या नाटकावर राम गणेश गडकऱ्यांच्या भाषेची छाप जबरदस्त आहे व मुळातील कवी जेव्हा

नाटककार होतो तेव्हा त्याची भाषा ही नक्षत्र-तारकांनी फुललेल्या नभांगणाचे रूप कशी घेते, याची साक्ष या दोघांचीही नाटके देतात. गडकरी, शिरवाडकरांचे हे नाते वणीच्या इनामदारांच्या घरी जमले. सप्तशृंग गडाच्या पायथ्याचे वणी हे गाव. तेथील इनामदारांच्या वाड्यात त्या काळी एक ग्रंथालय होते. या ग्रंथालयात तरुण शिरवाडकरांना राम गणेश गडकरी सापडले. 'वेरूळची लेणी पहावयास निघालेला पाहुणा कैलासातच जाऊन धडकावा, तसा तो अनुभव होता,' असे शिरवाडकरांनी गडकऱ्यांच्या नाटकांबद्दल लिहिले आहे. नाटककार शिरवाडकर वणीच्या इनामदारांच्या वाड्यात जन्मले. 'गडकरी हे माझे मध्यवर्ती दैवत बनले,' असेही त्यांनी लिहिले आहे. गोविंदाग्रजांच्या या प्रभावातूनच कुसुमाग्रज जन्माला आले, शिरवाडकर लिहितात, 'येथे नाटक मनात रूतून बसले.'

त्यामुळेच वि. स. खांडेकरांचे राम गणेशांवरील 'गडकरी, व्यक्ती आणि वाङ्मय' हे पुस्तक प्रसिद्ध झाले तेव्हा संतप्त झालेल्या नव्या लेखकांपैकी कुसुमाग्रज हे होते. शिरवाडकरांनी खांडेकरांचे सर्व मुद्दे खोडून काढणारा एक प्रदीर्घ लेख लिहिला, परंतु तो कुणीही प्रसिद्ध केला नाही.

गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या प्रेरणेने खांडेकरांनी तो ग्रंथ लिहिला, परंतु काळाच्या उदरात कोल्हटकरांची नाटके संपली, गडकऱ्यांची टिकली. हे पाहिल्यावर मृत्यूनंतर स्वर्गात गेलो तर गडकऱ्यांची क्षमा मागेन असे खांडेकरांनी पुढे लिहिले. 'गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय' या पुस्तकावर प्रदीर्घ टीकालेख शिरवाडकरांनी लिहिला याचा कधीच पत्ता खांडेकरांना लागला नाही. खांडेकर कुसुमाग्रजांच्या 'ज्योत्स्ना' मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या कविता वाचून तृप्त होत होते. त्यांनी परभारे या कविता एकत्र केल्या. छापून घेतल्या व त्याची तयार प्रत कवीला सादर केली. खांडेकरांच्या या अलौकिक व शुद्ध वाङ्मयप्रेमाने कुसुमाग्रजांच्या मानस सरोवरात तरंग उठले ते कायम आहेत. कविता संग्रह मग येत राहिले. एक दुर्लक्ष आशावाद या कवितांनी निर्माण केला.

**'चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती.**

**कथा या खुळ्या सागराला,**
**अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा.**
**किनारा तुला पामराला....'**

या काव्यपंक्तींनी मराठी माणसाला आकर्षित केले ते कायमचे. आपल्या कवितांना त्यांनी एकदा समिधा म्हटले. 'समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा,' असे १९४० मध्ये पुणे मुक्कामी त्यांनी लिहिले. कुसुमाग्रजांना नाशिकने तसे पुष्कळ घडवले. गंगेने त्यांच्या मनाचे मानस सरोवर केले. सप्तशृंग गडाने, पंचवटीने आणि तीळभांडेश्वराने रमणीयता, त्याग आणि तेजस्विता यांच्या पालखीत ते 'पिचेल मनगट परी उरातील अभंग आवेश' गाणारे मन मिरवले. त्याचबरोबर पुण्यानेही त्यांना काही दिले असावे. त्यांचा जन्म पुण्यात झालेला आहे. त्याशिवाय त्यांच्या अनेक चांगल्या व गाजलेल्या कविता त्यांनी पुण्यात लिहिलेल्या आहेत, 'गर्जा जयजयकार' हे क्रांतिगीत १९३९ मध्ये त्यांनी पुण्यातच लिहिले. 'वाटेवरल्या सावल्या' या त्यांच्या वेगळ्या नावाच्या जुन्या पुस्तकाची सुधारित आवृत्ती नुकतीच प्रसिद्ध झाली. त्यात 'मुक्काम पुणे' म्हणून एक बहारदार प्रकरण आहे. शिवराम महादेव परांजपे, काकासाहेब खाडिलकर हे चक्क रस्त्यात उभे राहून बोलत आहेत हे पाहून स्तिमित झालेले शिरवाडकर त्यात आहेत. टांग्यातून तात्यासाहेब केळकर जाताना पाहून विस्मयचकित झालेले कवी कुसुमाग्रज आहेत. 'यातला एखादा पुरुष उचलून आता नाशकात किंवा पिंपळगावला नेऊन ठेवला तर सारे गाव रस्त्यावर येईल', असे लिहिणारे शिरवाडकर शेवटी म्हणतात, 'पुण्याचे समग्र दर्शन अद्यापही झालेले नाही!' कवीला ते असाध्य ठरले तेथे इतरांचे काय? कुसुमाग्रजांची बहीण कुसुम पुण्याला असते. कंटाळा आला की ते पुण्याला जातात. विशेषतः क्रिकेटचे सामने असले की पुण्याला जातात व दूरदर्शनवर क्रिकेट पाहात बसतात.

**पत्रकार शिरवाडकर**

कवी नाटककार, ललित लेखक शिरवाडकरांचा पत्रकार हा एक पैलू बराचसा अज्ञात आहे. त्यासाठी 'सप्तशृंग नावाच्या डोंगरास' अर्पण केलेले 'वाटेवरच्या सावल्या' हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक बघावयास हवे. शिरवाडकर जसे स्वतःबद्दल कधी बोलत नाहीत, तसे

ते या पुस्तकातही स्वतःबद्दल फारसे लिहीत नाहीत. परंतु या लेखाच्या निमित्ताने त्यांनी नियतकालिकांच्या जगात जी भटकंती केली व ती करीत असताना जे अनेक मान्यवर संपादक त्यांना भेटले, त्यांची बहारदार व्यक्तिचित्रे या पुस्तकात रेखाटली आहेत. खांडेकरांच्या पत्रामुळे ते प्रथम दौडकरांच्या 'सारथी' या मुंबईच्या साप्ताहिकात आले.व्ही. शांताराम यांच्या नेतृत्वाखाली कीर्तीमान झालेल्या 'प्रभात' मध्ये प्रवेश करण्याच्या खटपटीत असताना खांडेकरांचे पत्र आले व शिरवाडकर 'सारथी' त आले. व्ही. शांताराम यांनी त्यांना गाण्यास सांगितले व कवी कुसुमाग्रज चक्क १५ मिनिटे 'जागो मोहन प्यारे' गायले. १५ मिनिटे इतक्या मोठ्या दिग्दर्शकाला ''आपल्या गाण्याच्या चरकात'' कसा घातला याची आठवण आज ते सांगतात. 'सारथी' तून ते पुढे 'धनुर्धारी' त आले. त्याकाळी श्री. प्रभाकर पाध्ये हे 'धनुर्धारी' चे संपादक होते. म्हापणकरांच्या भविष्याने साप्ताहिक जोरात खपत होते. शिरवाडकर 'धनुर्धारी' त लागले तेव्हा एका टेबलावरच पाध्ये, शिरवाडकर व केळुस्कर बसत. म्हापणकरांना 'महासंपादक' असे नाव शिरवाडकरांनी दिले. कारण शेवटी या तिघांनी कितीही चांगला मजकूर लिहिला तरी 'धनुर्धारी' ओळखला जात होता तो म्हापणकरांच्या भविष्यामुळे.

या काळाचे फार सुरेख वर्णन शिरवाडकरांनी केले आहे. 'धनुर्धारी' त त्यावेळी पहिल्या पानावर 'सप्रेम नमस्कार' म्हणून एक सदर असे. त्या आठवड्यात गाजलेल्या व्यक्तींना उद्देशून खोचक-बोचक पत्रे लिहिलेली असत. मी स्वतः ती पत्रे त्यावेळी नेहमी वाचत असे. परंतु कुसुमाग्रज ते लिहित हे मला माहीत नव्हते. कै. अ. सि. केळुस्करांनी ते नंतर सांगितले. इतक्या लहान खोलीत हे सर्व बसत की, त्यांना मालक बाबुराव सापळे यांच्या नावावरून 'सापळ्यातील उंदीर' असे म्हणत. 'परंतु सापळ्यातील नव्हतो तर बिळातील होतो. कारण मालक सापळे संपादकीय कामात हस्तक्षेप तर सोडाच, परंतु आमच्या खोलीत पदक्षेपही करीत नसत!'

श्री. प्रभाकर पाध्ये यांचे सुंदर व्यक्तिचित्र शिरवाडकरांनी 'त्रिभुवन रोड' या प्रकरणात लिहिले आहे. ''स्टॅलिनचा दुर्दम्य दावेदार,'' असे

वर्णन ते पाध्ये यांचा करतात. श्री. पाध्ये संतापले की, स्टॅलिन, चर्चिल, रुझवेल्ट यांची दाणादाण उडे, परंतु ''कापराच्या वड्या पेटविल्या तर त्या विझविण्यासाठी कोणी पाणी आणण्यासाठी धावाधाव करीत नाही,'' तसे पाध्ये रागावले की घडे. रेघांच्या कागदावरच लिहिण्याची पाध्ये यांची हौस व एखादा लेखक लेख परत मागण्यासाठी आला की, ''तुम्ही लेख रेघांच्या कागदांवर लिहिला आहे की कोऱ्या,'' असा मिश्किल प्रश्न विचारण्याची अ. सि. केळुस्करांची सवय. या सर्वाने शिरवाडकरांना तेथे फार मोठा आनंद दिला. डॉ. ग. य. चिटणीस, अनंत काणेकर, आचार्य अत्रे, पां. वा. गाडगीळ, पु. रा. लेले या सर्वांची तेथे हजेरी असे. गुरुवारी अंक निघे व गप्पात कामकाज संपे.

अशा त्या दिवसांतून एक दिवस शिरवाडकर बाहेर आले ते मुंबईच्या दगदगीला कंटाळून, तसेच रमाकांत वेलदे यांच्या 'स्वदेशी' साप्ताहिकाच्या आकर्षणाने. नाशिकहून 'स्वदेशी' साप्ताहिक काढण्याची योजना ठरली. 'नवयुग' साप्ताहिकात त्यावेळी शिरवाडकर 'हवाई हल्ला' हे सदर लिहीत असत. शिरवाडकर लिहितात की, 'धनुर्धारी'च्या पगारापेक्षा या एका लेखाचे अधिक पैसे 'नवयुग' मधील लेखातून मिळत. परंतु पैसा हा विषय आयुष्यात कधीच महत्त्वाचा न मानणाऱ्या शिरवाडकरांना नाशिकचे म्हणजे घरी येण्याचेच आमंत्रण होते. कै. रमाकांत वेलदे हा या वृत्तपत्रसृष्टीतील एक अजब असामी होऊन गेला. पाठीवर कुबड असूनही उत्तम क्रिकेट खेळणारा, रॉय किणीकरांप्रमाणे रोज नवी स्वप्ने पाहणारा, कधीही निराश न होणारा हा माणूस शिरवाडकरांच्या शब्दातूनच वाचायला व ऐकायला हवा. विष्णुपंत भागवत आज हयात नाहीत, परंतु त्यांच्या लग्नात रमाकांत वेलदे यांनी केलेली तार शिरवाडकरांनी दिली आहे. 'मॅरेज इज नॉट मौज, इट इज सत्यकथा,' अशी तार त्यांनी केली होती. नाशिकच्या सुदर्शन प्रेसची केलेली पुनर्रचना, वेलदे - शिरवाडकर जोडीचे तेथे व तेथून जाणे - येणे हे मी स्वतः त्याकाळी पाहिले ते केवळ योगायोगाने. शाळा कॉलेजांच्या सुट्टीत नेहमी नाशिकला मावशीकडे माझा मुक्काम असे. त्यांच्या घरासमोरच हा प्रेस होता. असे हे 'स्वदेशी'ही पुढे संपले व शिरवाडकरांची नियतकालिकातील भ्रमंतीही संपली. ते नाशिककर

होते, ते कायमचे नाशिककर झाले. कुसुमाग्रज बैठकीत म्हणाले, ''कवी, कविराज या नावांनी काही मित्र मला हाक मारतात, परंतु 'कवे' ही संस्कृत हाक मारणारे एक वेलदेच होते.''वेलदे यांच्या शिवाय आजही नाशिक त्यांना सुने वाटते.

या गर्दीतील त्यांचे दैनिक वृत्तपत्रव्यवसायात वास्तव्य झाले ते वालचंद कोठारींच्या 'प्रभात'मध्ये व आणखी होणार होते ते वृत्तपत्र न निघाल्यामुळे टळले ते कै. नानासहेब परुळेकरांच्या 'न्यू एज' या इंग्रजी दैनिकातले! ती सर्व हकिकत मोठी मनोरंजक आहे. श्री. पां. वा गाडगीळ संपादक असलेल्या 'लोकशक्ती' दैनिकात सर्वप्रथम शिरवाडकर गेले. तेथे कोण - कुणाचा याचा पत्ता न लागल्याने 'प्रभात'मध्ये गेले. तेथे खूप रमले. रात्रपाळीचा आनंद, वृत्तपत्रातील घालमेल हे सर्व त्यांनी तेथे अनुभवले. तीन - साडेतीन वर्षे शिरवाडकर 'प्रभात'मध्ये होते. या 'प्रभात'मधूनच ते मुंबईला 'सारथी'त गेले. एक दिवस 'न्यू एज्'ची जाहिरात वाचली म्हणून त्यांनी अर्ज केला. कै. परुळेकर त्यावेळी मुंबईत 'स्वराज्य' हे मराठी दैनिक चालवत असत व त्यांनी 'न्यू एज्'म्हणून इंग्रजी दैनिक सुरु करण्याचे ठरविले होते. कविराज कोट घालून इंटरव्ह्यूला गेले. सर्व उमेदवार हमाम स्ट्रीटवरील एका कळकट इमारतीच्या एका खोलीत बसलेले असताना एक गृहस्थ बाहेर आले. 'हमाम स्ट्रीट'या रेखीव प्रकरणात शिरवाडकर लिहितात, ''या माणसाच्या हातात लहानशी छडी दिली तर तो आता एखाद्या बँडचे किंवा ऑर्केस्ट्राचे नेतृत्व करायला लागेल. तो नाचत नाचतच समोर आला आणि त्याने आम्हाला अकस्मात विचारले, 'डिड यू ईट् जंटलमेन?' आणि त्याने सर्वांना जेवण्यास पिटाळले.''

कै. परुळेकरांनी 'न्यू एज्'चा संपादक करण्यासाठी ज्याला अमेरिकेहून आणले होते तो मुट्टगल या नावाचा तो संपादक होता. त्याने सर्वांना जेवावयास पिटाळले, कारण परुळेकर आलेले नव्हते.

ते इंग्रजी दैनिक कधीच निघाले नाही, तेव्हा 'स्वराज्य' दैनिकाच्या बरोबरीने 'प्रभा' नावाचे साप्ताहिक काढावयाचे कै. परुळेकरांनी ठरविले व त्यासाठी शिरवाडकरांना नेमण्यात आले.

परुळेकर - शिरवाडकर भेटीचा रसिला वृत्तांत कुसुमाग्रजांनी लिहिला

आहे. ''सर्वांपासून दूर राहणारे, आत्ममग्न, बुद्धिमान आणि श्रमशील, महत्वाकांक्षी पण विविध चिंतांच्या जंजाळाने ग्रासलेले'' असे चित्र शिरवाडकरांनी परुळेकरांच्या पहिल्या दर्शनाचे रेखाटले आहे.

शिरवाडकर समोरच्या खुर्चीवर बसले. टेबलावर हात टेकले आणि टेबलाच्या पावक्यावर ठेवलेले पाय त्यांनी जोरजोराने हलवायला सुरुवात केली. त्याबरोबर सारे टेबल हलू लागले.

परुळेकर म्हणाले, ''तुम्ही पाय हलवता आहात का?'' शिरवाडकर एकदम जाग आल्याप्रमाणे ओशाळून उत्तरले, ''हो.''

''शिरवाडकर, एक लक्षात ठेवा,''परुळेकर समजावणीच्या परंतु तीव्र स्वरात म्हणाले, ''आपण घराच्या बाहेर गेलो म्हणजे रीतिरिवाज पाळणं आवश्यक असतं. कोणाला भेटायला गेलात तर पाय पुन्हा असे हलवू नका.''

कै. परुळेकरांच्या राज्यात ''सैलपणा, गबाळेपणा, आळस या महारिपूंना अजिबात अवसर नव्हता. 'तडजोड' अथवा 'चालेल' हे शब्द त्यांना माहीत नव्हते. त्यांच्याशी झालेल्या पहिल्याच मुलाखतीत परुळेकर म्हणाले, ''शिरवाडकर, तुम्ही कविता, गोष्टी किंवा आणखी असं काही लिहिता, ही गोष्ट या कचेरीत काम करताना पार विसरून जा. तुमच्या त्या लेखनाचा व वृत्तपत्र-व्यवसायाचा काही संबंध नाही! तुम्हाला सरळ लिहिता येतं हे एकच तुमचं क्वालिफिकेशन मानतो.''

मुंबईतील 'प्रभा' साप्ताहिकही तेव्हा चांगले चालले नाही. शिरवाडकर तेथून निघाले तेव्हा परुळेकर म्हणाले, ''सध्या राहा म्हणून सांगणं कठीण आहे, पण चांगले दिवस आले म्हणजे पुन्हा भेटू.''

शिरवाडकर लिहितात, ''ही भेट पुन्हा कधीच झाली नाही. परंतु पुढे वेगवेगळ्या नियतकालिकांत श्रम करताना त्या अल्पकाळात गोळा केलेले भांडवल उपयोगी पडले. अद्यापही पडते आहे.''

हे आज सर्वच विचित्र वाटते. परुळेकरांचा व्यवस्थितपणा शिरवाडकरांनी घेतला असता तर ते कवी राहिले नसते. परुळेकरांचे 'प्रभा' बंद पडले, 'स्वराज्य' दैनिकही त्यांनी पुण्यास नेले व त्याचे साप्ताहिक केले. 'सकाळ'चा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. आणि कै. परुळेकरांच्या पहिल्या धडपड्या काळात भेटलेले शिरवाडकर

महाराष्ट्राचे सर्वश्रेष्ठ कवी, ज्येष्ठ नाटककार, उत्तम ललित लेखक म्हणून सत्तरीच्या पुढे गेले. आयुष्याच्या या भ्रमंतीनेच शिरवाडकरांचे मन निर्वैर केले काय? परंतु सर्वांचे तसे होत नाही. शिरवाडकरांनी आयुष्यभर जगाच्या बागेत आशावाद शिंपला, लोभाची विषवल्ली आपल्या वैयक्तिक जीवनाच्या मळ्यातही वाढू दिली नाही आणि जगातील अन्याय, पददलितांचे, सामान्यांचे दुःख यांच्या निवारणाचा विचार इतक्या निष्ठापूर्वक जपला की, त्या मानस सरोवरात केव्हाही डोकावले तरी दुसरे काही सापडू नये. पूर्वीचे ऋषीमुनी व्रतस्थ राहत. आपल्या जीवनात व लेखनात व्रतस्थ राहिलेला हा गोदातटाकीचा कवये. त्याने आणलेल्या मराठी साहित्याचे किनारे केव्हाच खूष झाले आहेत. गोवा स्वतंत्र झाल्यावर तेथे झालेल्या पहिल्या भव्य मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद कवी कुसुमाग्रजांनी भूषविले. त्यावेळी त्यांच्यावर सर्वात तृप्त होते ते भाऊसाहेब बांदोडकर.

**सामाजिक परिषद**

न्या. महादेव गोविंद रानडे यांनी स्थापन केलेल्या सामाजिक परिषदेच्या शताब्दीचा सोहळा निफाड येथे साजरा केला, तेव्हा कवी कुसुमाग्रज स्वागताध्यक्ष होते. त्यांच्या हस्ते समता ज्योतीचे प्रज्वलन सकाळी झाले. निफाडच्या तरुणांनी ही ज्योत धावत मुंबईपर्यंत आणली आणि महाराष्ट्र विधानसभेच्या समोर उभारलेल्या जोतिबा फुले यांच्या पुतळ्यासमोर सभापती श्री. शंकराव जगताप यांनी ती स्वीकारली. श्री. शिरवाडकरांनी आपल्या भाषणात सांस्कृतिक विषमता नष्ट करण्यावर भर दिला. या सामाजिक परिषदेने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठा आधार दिला. त्यामागे कुसुमाग्रजांची वैचारिक प्रेरणा होती. आपल्या आतापर्यंतच्या भाषणात त्यानी जे विचार मांडले अगर विधाने केली, ती आज जनमानसात तत्त्ववेत्त्याच्या उक्तीप्रमाणे रुजली आहेत. ''संस्थांची जेव्हा संस्थाने होतात तेव्हा खुर्च्यांची सिंहासने होतात, आणि मग ती सोडावीशी वाटत नाहीत'' असे उद्‌गार गोवा हिंदू असोसिएशनच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमात काढले होते. ''महात्म्याला दोनदा मरण पत्करावे लागते. एकदा त्याचे शरीर मरण पावते आणि नंतर त्याचे अनुयायी त्याच्या विचारांचा त्याग करून त्याला दुसऱ्यांदा

स्वर्गलोकी पाठवितात. त्यानी आपल्या आयुष्याचे प्रतिक म्हणून पणतीची निवड केली असावी. कारण अनेक सभांत त्यांनी ही गोष्ट सांगितली. सूर्य अस्ताला जायला निघाला, तेव्हा त्याने विचारले, मी परतेपर्यंत या पृथ्वीला प्रकाश देण्याचे कार्य कोण करणार आहे? त्यावेळी एक पणती पुढे आली आणि म्हणाली ''मी लहान आहे, परंतु माझ्या प्रकाशाने हे जग उजळविण्याचा मी प्रयत्न करीन.''

साने गुरुजींच्या पासून मीही कथा ऐकत आलो आहे. यात मला नम्रता, लहान राहूनही आपले काम ध्येयासक्त वृत्तीने करण्याची जिद्द दिसून आली. म्हणूनच त्यांचे जीवन आदर्श वाटले. त्या काळात त्यांनी लिहिले

**'विजयासाठी माझी कविता कधीच नव्हती**
**म्हणून तिजला भीती नव्हती पराभवाची**
**जन्मासाठी आडून केव्हा नाही ती बसली**
**म्हणून नाही भीती तिजला मरावयाची.'**

आपल्या कवितेच्या अमरत्वाचे गीत गाणारे कुसुमाग्रज आज तृप्त आहेत. एकाकी असले तरी आनंदी आहेत. कारण प्रयत्न न करता अद्वितीय यश पायाशी आणले, याबद्दल त्यांच्या मनात या जगाबद्दलच एक कृतज्ञतेची भावना आहे. मुखी 'श्रीराम' आहे, आणि मनात जगाचे भले आहे.

***

REFBK-0025976

३३७५ २५७८६ निबंध १४ ८०८

# श्रीविद्या प्रकाशन

